कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## दिव्यांग संस्थांवर होणार कारवाई?

**रायगड :** जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात नोंदणी न करता कार्यरत असलेल्या संस्थांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, अशा संस्थांसाठी नोंदणी करणे अत्यावश्यक असून ३० नोव्हेंबर २०२५ ही अंतिम मुदत दिली आहे. दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, दिव्यांग क्षेत्रात कार्यरत सर्व संस्थांची अधिकृत नोंदणी अनिवार्य असल्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. संबंधित संस्थांनी आपला नोंदणी प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाकडे सादर करावा लागणार आहे. पान २ वर

## दिल्ली ब्लास्टचे बांगलादेश कनेक्शन

**नवी दिल्ली :** दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्ब ब्लास्ट प्रकरणाच्या तपासात पाकिस्ताननंतर आता बांगलादेशची भूमिका समोर आली आहे. तपासात असे आढळले आहे की, फरीदाबादमध्ये सापडलेली स्फोटके बांग्लादेशातून मुर्शिदाबाद मार्गे भारतात आणले होते. या प्रक्रियेत इख्तियार नावाचा संशयित मुख्य भूमिका निभावत होता. आधीच उघड झालेल्या जैश-ए-मोहम्मदच्या सहभागानंतर, बांग्लादेशातील दहशतवादी गटांची शंका बळावली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, तपास यंत्रणांनी सांगितले की, बांग्लादेशातून तस्करी केलेले स्फोटक मुर्शिदाबाद जिल्ह्याचा ट्रान्झिट रुट म्हणून वापरुन फरीदाबादपर्यंत पोहोचवण्यात आले.

## वे|ध|क

### भावा-बहिणीचा बुडून मृत्यू

**राहाता :** जुन्या खाणीच्या खोल पाण्यात पडलेल्या मेंढीला वाचवताना बुडून सख्ख्या भावा-बहिणीचा करुण अंत झाला. ही घटना शनिवारी (दि. १५) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील डाऊच खुर्द येथे घडली. खाणीत जास्त पाणी आणि दलदल असल्यामुळे दोघेही घाबरल्यामुळे ते दोघेही पाण्यात बुडाले. शवविच्छेदनानंतर दोन्ही पार्थिवावर डाऊच खुर्द येथे अत्यंत शोकाकुल आणि हृदय हेलावून टाकणाऱ्या वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे गणपत बडे यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सार्थक गणपत बडे व सुरेखा गणपत बडे (दोघेही, रा. डाऊच खुर्द) पान २ वर

### मुलाची गोळ्या झाडून हत्या

**पंजाब :** पंजाबमध्ये आरएसएसच्या ज्येष्ठ नेत्याच्या मुलाची भरदिवसा हत्या करण्यात आल्याची घटना घडली. शनिवारी दोन हल्लेखोरांनी दुचाकीवरून येत गोळ्या झाडल्या. यात नवीन अरोरा यांचा मृत्यू झाला. नवीन अरोरा हे पंजाबमधील ज्येष्ठ आरएसएस नेते बलदेव राज अरोरा यांचे पुत्र होते. फिरोजपूर शहरात बँकेसमोरच त्यांच्यावर अज्ञातांनी गोळ्या झाडल्या. या घटनेनंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा झाल्यानंतर अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. फिरोजपूरमध्ये बलदेव राज अरोरा यांच्या मुलाची शनिवारी हत्या करण्यात आली. युको बँक आणि स्टेट बँक ऑफ इंडियाजवळ दोघांनी नवीन अरोरावर गोळ्या झाडल्या.

### निकष पूर्ततेकडे विद्यापीठांची पाठ

**पुणे :** राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांच्या केलेल्या मूल्यांकनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अनुत्तीर्ण ठरले आहे. या मूल्यांकनात पुणे विद्यापीठ शेवटच्या स्थानी असून, गोंडवाना विद्यापीठाने पहिला क्रमांक पटकावला आहे. तर त्या खालोखाल मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाने स्थान मिळवले आहे. मात्र, या मूल्यांकनातील गुणांकन पाहता विद्यापीठांनी निकष पूर्ततेकडे पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. सेवाशर्ती कार्यक्रमाअंतर्गत आकृतिबंध, सेवा प्रवेश नियम, अद्ययावत ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करणे, पदोन्नतीने पान २ वर

### चार मावश्यांनी भाच्याला संपवलं

**जोधपूर :** राजस्थानमधील जोधपूरमध्ये १७ दिवसांच्या नवजात बाळाची त्याच्या मावशींनी हत्या केल्याची घटना समोर आली आहे. अंधश्रद्धेमुळेनवजात बाळाची हत्या केल्याचा आरोप आहे. नवजात बाळाच्या वडिलांनी आणि आजोबांनी असा आरोप केला आहे की बाळाच्या चार मावशी त्यांच्या मोठ्या कुटुंबाचा हेवा करत होत्या.वडिलांचा आरोप आहे की मुलाच्या आईच्या चार बहिणींनी प्रथम नवजात बाळाचे हातपाय तोडले आणि नंतर त्याचा गळा दाबून खून केला. वडिलांच्या एफआयआरनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे आणि चार आरोपी महिलांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी सांगितले की, त्यांना पान २ वर

# किनारी मच्छिमारांच्या उदरनिर्वाहावर गदा!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

केंद्र सरकारने नुकतीच जाहीर केलेली विशेष आर्थिक क्षेत्रातील मासेमारीसाठी शाश्वत उपयोग नियमावली २०२५ ही योजना देशातील पारंपरिक मच्छीमारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण करणारी ठरली आहे. या नियमांनुसार खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी मोठ्या उद्योग समूहांना आणि धनिक उद्योजकांना कायदेशीर परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे किनाऱ्यालगतच्या छोट्या नौकांवर आणि पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांच्या उपजीविकेवर गदा येणार असल्याचा आरोप विविध मच्छिमार संघटनांकडून करण्यात आला आहे.

सरकारने या योजनेचे समर्थन करताना सांगितले आहे, की भारताच्या विस्तीर्ण सागरी क्षेत्रातील मासेमारी वाढवणे, निर्यात वृद्धिंगत करणे आणि निळ्या अर्थव्यवस्थेला चालना देणे हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे. या नियमांनुसार १२ ते २०० सागरी मैलांच्या विशेष आर्थिक क्षेत्रात परवाना घेतलेल्या मोठ्या नौकांना खोल समुद्रात मासेमारी करण्याची परवानगी देण्यात आली आहे. सरकारचा दावा आहे, की या उपक्रमामुळे मासेमारी उद्योग अधिक संघटित होईल, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढेल आणि देशाची सागरी अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. मात्र या योजनेमुळे किनारी भागातील पारंपरिक मच्छीमारांचे उत्पन्न आणि उपजीविका धोक्यात येईल, असे मच्छिमार संघटनांचे म्हणणे आहे. त्यांचा आरोप आहे, की ही योजना मोठ्या व्यापारी गटांच्या फायद्यासाठी आखली गेली असून, छोट्या मच्छिमारांच्या हिताकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे.



### सरकारकडून मच्छिमारांवर अन्याय!

सरकारने मच्छिमारांनी सादर केलेल्या २२ महत्त्वपूर्ण सूचनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. जीवनपद्धतीकडे, परंपरेकडे आणि पिढ्यानपिढ्यांच्या संघर्षाकडे सरकारने पाठ फिरवली आहे. मोठ्या नौकांना खोल समुद्रात प्रवेश देऊन सरकारने आमच्या अस्तित्वावरच गदा आणली आहे. ५ नोव्हेंबरला केंद्र सरकारला निवेदन सादर करून राज्यातील मासेमारी बंदी कालावधीचे काटेकोर पालन करण्याची आणि पर्ससीनसारख्या अवैध मासेमारीवर नियंत्रण ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे. सरकारने सध्याच्या अधिसूचनेत तातडीने बदल करून पारंपरिक मच्छीमारांच्या सूचनांचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### योजनेचा होणार थेट परिणाम

विशेष आर्थिक क्षेत्रातील सागरी संसाधने पुरेशा प्रमाणात वापरात आलेली नाहीत. खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी मोठ्या नौकांना परवानगी दिल्यास निर्यात वाढेल, आधुनिक साधनांचा वापर होईल आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. सरकारचा दावा आहे, की ही नियमावली पर्यावरणपूरक आणि शाश्वत मासेमारीसाठी राबवली जात आहे. मात्र सागरीतज्ज्ञांच्या मते मोठ्या नौकांमुळे समुद्रातील माशांचे प्रमाण घटू शकेल, लहान बोटींचे उत्पादन कमी होईल आणि किनारी भागातील हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येऊ शकते. त्यामुळे या योजनेचा थेट परिणाम ग्रामीण आणि पारंपरिक मच्छिमारांवर होणार असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

११ सागरी राज्यांतील पारंपरिक मच्छिमार संघटनांशी संपर्क साधला गेला असून, लवकरच एकत्रित देशव्यापी आंदोलनाचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे.पर्यावरणीय धोका आणि सरकारचे स्पष्टीकरण खोल समुद्रातील मासेमारीसाठी मोठ्या नौकांना परवानगी दिल्यास पर्यावरणीय समतोल बिघडू शकतो. माशांचे उत्पादन घटल्यास किनारी भागातील मच्छिमारांवर आर्थिक संकट येईल, असे सागरी अभ्यासकांचे मत आहे. मत्स्योत्पादन मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले, की ही नियमावली सागरी संपत्तीचा शाश्वत उपयोग, निर्यातवाढ आणि निळ्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी राबवली जात आहे. मच्छिमार वंचित राहू नयेत, यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जाणार आहेत.

## परितक्त्या, एकल महिलांना
# लाडकी बहीण योजनेतून डच्चू?

- पतीच्या उत्पन्नावर सरकार ठेवणार करडी नजर
- योजनेचा लाभ वाचवण्यासाठी महिलांची धावबळ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत शासनाने पुन्हा मोठा बदल करत अनेक लाभार्थींना योजनेबाहेर केले आहे. यापूर्वी शासकीय महिला कर्मचारी, वाहन मालक तसेच जास्त उत्पन्न असलेल्या महिलांना वगळल्यानंतर आता पतीच्या उत्पन्नावर वॉच ठेवत नव्याने ई-केवायसीची अट घालण्यात आली आहे.

मात्र, एकल आणि परितक्त्या महिलांसाठी या अटी पूर्ण करणे अशक्यप्राय असल्याने त्यांना आपोआपच योजनेतून डच्चू मिळण्याची शक्यता अत्यंत वाढली आहे. १८ नोव्हेंबर ही केवायसीची अंतिम तारीख असून केवळ तीन दिवस उरले आहेत. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचा लाभ वाचवण्यासाठी महिलांची पंचायत समित्या, सेवा केंद्रे आणि महा-ईसेवा केंद्रांवर धावपळ सुरू झाली आहे.

योजनेअंतर्गत दरमहा १,५०० रुपये लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात येतात. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिलांनी मोठ्या संख्येने अर्ज सादर केले होते. परंतु आता विधवा व परितक्त्या महिलांसमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ई-केवायसी कशी करावी? कोणती कागदपत्रे द्यावी? पतीच्या उत्पन्नाचा दाखला कुठून मिळवावा? या संदर्भात वरिष्ठ पातळीवरून स्पष्ट सूचना मिळालेल्या नसल्याने या महिलांना तीव्र गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. आणि केवायसी न केल्यास योजनेतून त्यांनाही बाद करण्यात येऊ शकते, अशी चिंताजनक परिस्थिती आहे. शासनाने पान २ वर

## ढिगाऱ्याखाली मजुरांचा मृत्यू

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भायखळा येथील हबीब मॅन्शन, हंस रोड, भायखळा (पश्चिम) या ठिकाणी सुरू असलेल्या एका इमारतीच्या पायाभरणी आणि ढिगाऱ्याच्या कामादरम्यान माती आणि चिखलाचा काही भाग कामगारांवर कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत एकूण ५ कामगार मातीखाली दबले गेले होते. त्यांना तातडीने बाहेर काढण्यात आले आणि नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, नायर रुग्णालयाच्या डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, यातील २ जणांना मृत घोषित करण्यात आले आहे, तर उर्वरित पान २ वर

## नेरळ परिसरातील गो-तस्करी प्रकरण उघडकीस

- भिवंडी येथून एकास घेतले ताब्यात
- नेरळ पोलिसांची मोठी कामगिरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या गोवंशीय जनावरांच्या तस्करी प्रकरणाचा नेरळ पोलिसांनी अखेर पर्दाफाश केला आहे.

कोदिवले येथील शेतकरी भाऊ विठ्ठल सोनावणे आणि कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील अंजप गावातील तानाजी माळी यांच्या बैलांची दहा दिवसांपूर्वी कत्तलीसाठी चोरी झाल्याने तालुक्यात खळबळ माजली होती. याच प्रकरणाचा नेरळ पोलिसांनी पर्दाफाश पान २ वर



अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव वाजिद कुरेशी असे असून चौकशीदरम्यान त्याने कोदिवले आणि अंजप येथील गोवंशीय जनावरे चोरून कत्तल केल्याची कबुली दिली आहे. त्याचे इतर साथीदार फरार असून त्यांच्या शोधासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे.

## डॉक्टरने केला महिलेचा विनयभंग

**। रायगड । प्रतिनिधी ।**


रायगड जिल्ह्यात महिलांवरील गुन्ह्यांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. नुकतीच अलिबाग तालुक्यातील एका आयुर्वेद डॉक्टरने तपासणीच्या बहाण्याने मुंबईतून आलेल्या रुग्ण महिलेसोबत विनयभंग केल्याची घटना ताजी असतानाच आता पेण तालुक्यात आणखी एक प्रकार समोर आला आहे. अवघ्या सतरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीस गर्भवती ठेवून तिच्यावर अत्याचार केल्याचा प्रकार घडकीस आला आहे.

ही धक्कादायक घटना पेण तालुक्यातील आदिवासी समाजातील कुटुंबांमध्ये घडली आहे. पीडित मुलगी वयाने अवघी १६ वर्षे ११ महिने, म्हणजेच अल्पवयीन असूनही आरोपी युवकाने तिच्या अज्ञानाचा फायदा घेत तिच्याशी प्रेमसंबंध वाढवले. मिळालेल्या माहितीनुसार आरोपी आणि पीडित दोघेही एकाच परिसरातील असून परिचयातून जवळीक वाढली. आरोपीने मुलीला प्रेमाच्या नात्यात गुंतवून तिच्या मानसिक अपरिपक्वतेचा गैरफायदा घेतला. मंदिरात लग्न केल्याचे भासवून तिला घरी नेले आणि तिच्यावर वारंवार शारीरिक पान २ वर

## धावत्या बसला आग; ५० प्रवासी बचावले

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**

नागपूर-उमरेड महामार्गावर रविवारी दुपारी मोठी दुर्घटना टळली. एका खासगी ट्रॅव्हल्सच्या बसला अचानक भीषण आग लागल्याने काही क्षणासाठी घटनास्थळी भीती पसरली होती. मात्र, चालकाच्या तात्काळ निर्णयक्षमतेमुळे बसमध्ये प्रवास करणाऱ्या सुमारे ४० ते ५० प्रवाशांचे प्राण बचावले. ही घटना आज रविवारी दुपारच्या सुमारास चक्री घाटाजवळ घडली.




मिळालेल्या माहितीनुसार, बस उमरेड येथून नागपूरकडे येत होती. प्रवास सुरळीत सुरू असतानाच बस चालकाचं लक्ष इंजिनमधून निघणाऱ्या धुराकडे गेलं. काहीतरी बिघाड झाल्याची शंका येताच चालकाने लगेच बस रस्त्याच्या कडेला थांबवली. त्यानंतर त्याने प्रवाशांना तात्काळ बसमधून खाली उतरण्यास सांगितलं. त्याच्या यावेळी घेतलेल्या योग्य निर्णयामुळे मोठा अनर्थ टळला. प्रवाशांनी बाहेर पडताच काही मिनिटांत अगदी पाहताक्षणी आगीचे लोटांनी संपूर्ण बसला आपल्या कवेत घेतलं. काहीजणांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केला. प्रवाशांच्या डोळ्यांसमोर बस क्षणार्धात ज्वालांनी वेढली गेली. अखेर काही वेळातच संपूर्ण बस राख झाली.

घटनेची माहिती मिळताच उमरेड पोलीस आणि अग्निशमन दलाची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. पान २ वर

## गेट टुगेदर ठरले अखेरचे

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वीस-पंचवीस वर्षांनंतर सहा व्यावसायिक मित्र कोकणात एकत्र जमले, जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, मात्र हा आनंद सोहळा काही क्षणात शोकांतिकेत बदलला. मुंबईतील प्रभादेवी भागातील ७१ वर्षीय रहिवासी आनंद अय्यर यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. अहमदाबाद आणि मुंबई येथील पाच-सहा सहकारी मित्रांनी दोन दिवसांपूर्वी कोकणातील रायगड जिल्ह्यात रेवदंडा येथे गेट-टुगेदरचे आयोजन केले होते. सर्व जण एका पान २ वर





पर्यटनासाठी अलिबाग, मुरुड येथे आलेल्या पर्यटकांना परतीच्या वेळी अलिबाग वडखळ मार्गावरील खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडीचा फटका बसला. या मार्गावर वाहतूक कोंडीमुळे वाहनांची रांग लागली होती. (छायाचित्र :समीर मालोदे)

## पूर्वप्राथमिक शिक्षण धोरण लालफितीत

**नामांकित शाळांची ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

एकीकडे नोव्हेंबर महिन्यात राज्यातील खासगी शिक्षण संस्थांच्या विनाअनुदानित शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या पूर्वप्राथमिक वर्गांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे, तर दुसरीकडे राज्य सरकारचे पूर्वप्राथमिक शिक्षणाचे धोरण अद्यापही लालफितीत अडकले आहे. राज्यात यंदाच्या शैक्षणिक वर्षात पूर्वप्राथमिक शिक्षणाचे धोरण लागू करण्यात शालेय पान २ वर

### पालकांची अशी होतेय दिशाभूल

- पूर्वप्राथमिक खासगी शाळांकडून अवाजवी शुल्क आकारणी
- खासगी शाळांच्या संकेतस्थळावर अपुरी माहिती
- खासगी शाळांच्या अधिकृत नोंदणीचा अभाव
- पूर्वप्राथमिक शाळांवर नियंत्रण कोणाचे?, याचे चित्र अद्याप अस्पष्ट
- प्रवेश शुल्क, देणगी मूल्य (डोनेशन) या नावाखाली पालकांची लूट

> “शिक्षण विभागातर्फे पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या धोरणाचा मसुदा राज्य सरकारसमोर सादर करण्यात आला आहे. यात पूर्वप्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम याअनुषंगाने मार्गदर्शक सूचनादेखील दिल्या आहेत. पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या धोरणासंदर्भात शिक्षण सचिव, सर्व संचालक यांची शासन स्तरावर दिवाळीपूर्वी बैठकदेखील झाली आहे. धोरणाचा मसुदा निश्चित होण्याची प्रक्रिया अंतिम स्तरावर आहे.”
>
> – शरद गोसावी, संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय.

**८०० ते १००० बस सोडणार | विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा**

# शालेय सहलींसाठी एसटीकडून मिळणार सूट

**। रायगड । प्रतिनिधी ।**

दरवर्षी शाळा आणि महाविद्यालयातून सहलींचे आयोजन केले जाते. अशातच आता सहलीचा प्रवास विद्यार्थ्यांना परवडणारा आणि सुरक्षित होण्यासाठी एसटी महामंडळाने मोठी घोषणा केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा मिळाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शालेय सहलींसाठी राज्य परिवहन बसेसची घोषणा केली आहे. तसेच या प्रवासात भाड्यात ५० टक्के सवलत दिली आहे. याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जारी केले असून त्यानुसार, २५१ बस महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस डेपोमधून शाळा आणि महाविद्यालयांना दररोज सुमारे ८०० ते १,००० नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे म्हटले आहे.

विद्यार्थ्यांसाठी एमएसआरटीसीचा मोठा निर्णय

विद्यार्थी शैक्षणिक सहलींसाठी मोठ्या प्रमाणात उत्सुक असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवास मिळावा यासाठी, एमएसआरटीसी यावर्षी शालेय सहलींसाठी नवीन बसेस उपलब्ध करून देणार आहे. तसेच सहलींच्या एकूण भाड्यात ५० टक्के सूट देणार आहे.



दरम्यान, नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत एमएसआरटीसीने शैक्षणिक सहलींसाठी १९,६२४ बसेस पुरवल्या होत्या, ज्यामुळे परतफेडीसह ९२ कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. तर २०२५-२६ साठी, मंत्र्यांनी डेपो व्यवस्थापक आणि स्टेशन प्रमुखांना शैक्षणिक संस्थांशी समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच राज्यातील प्रमुख ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेटण्याचे नियोजन करण्यासाठी आगार प्रमुख, स्टेशन अधिकारी, शाळा आणि महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांना भेटतील, असे त्यात म्हटले आहे.

## संचालकांकडून होणार पेण अर्बनची वसुली





**। रायगड । प्रतिनिधी ।**

पेण अर्बन बँक घोटाळ्यातील २५ आरोपींवर प्रत्येकी २३ कोटी ९० लाख रुपयांची सामूहिक व वैयक्तिक वसुलीची जबाबदारी सहकार आयुक्तांनी निश्चित केली आहे. ठरलेल्या मुदतीत ही रक्कम वसूल न झाल्यास संबंधित संचालक व जबाबदार व्यक्तींवर व्याजासकट वसुली करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या घोटाळ्याची एकूण रक्कम ५९८.७२ कोटी रुपये असून, ती माजी संचालक व कर्मचारी अशा २५ जणांवर विभागली आहे.

२०११ मध्ये रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. त्यानुसार सहकार कायदा १९६० च्या कलम ८८ अंतर्गत चौकशी सुरू झाली होती. मात्र या वसुलीची गती अत्यंत मंद असून, विशेष कृती समितीकडून सातत्याने दिरंगाई होत असल्याची तक्रार ठेवीदार संघटनांनी केली आहे. त्यामुळे सुरू असलेल्या न्यायालयीन पान २ वर

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# रक्तटंचाईने जीव टांगणीला

## उपजिल्हा रुग्णालयातील शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

अत्यल्प प्रमाणात होणाऱ्या रक्तदान शिबिरांमुळे त्याचा फटका पनवेल तालुक्याला बसू लागला आहे. शहरातील सर्वच प्रमुख रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा साठा कमी झाला असून, उपजिल्हा रुग्णालयातील शस्त्रक्रिया पुढे ढकलण्याची वेळ आली आहे. दिवाळीनंतर विविध कारणांमुळे रक्तदान शिबिरे भरवण्यात दुर्लक्ष झाले आहे. शाळा-महाविद्यालयांना सुट्ट्या असल्यामुळे संस्थांच्या शिबिरांची परंपरा खंडित झाली. अशातच यंदा पावसाचादेखील जोर असल्याने नियोजन विस्कळित झाले. परिणामी, रक्तपेढ्या नवीन संकलन करू शकल्या नसल्याने उपलब्ध रक्तसाठा अपुरा पडू लागला आहे.

शहरातील श्री साई, रोटरी क्लब, जीवन रेख, सद्गुरू, महात्मा गांधी मिशन मेडिकल, संजीवनी, स्वस्तिक, साई रक्त केंद्र, बी. व्ही. लिमये रोटरी क्लब ऑफ नवीन पनवेल अशा सर्वच रक्तपेढ्यांमध्ये रक्तसाठा अत्यल्प आहे. काही रक्तपेढ्यांमध्ये तर विशिष्ट रक्तगटांच्या पिशव्यांचे प्रमाण शून्य असल्यामुळे रुग्णांच्या नातेवाइकांची धावपळ सुरू आहे.

**थॅलेसेमिया रुग्णांना त्रास**

पनवेल तालुक्यात १०० ते १५० थॅलेसेमिया रुग्ण आहेत. या रुग्णांना नियमित अंतराने रक्त देणे अत्यावश्यक आहे. असह्य अशक्तपणा, थकवा, पिवळेपणा, ताप, श्वास घेण्यास त्रास, अशा गंभीर लक्षणांवर नियंत्रणासाठी रक्त संक्रमण एकमेव उपचार आहे, पण टंचाईमुळे अनेक रुग्णांना नियोजित तारखेला रक्त मिळत नसल्याने उपचारांमध्ये विलंब होत आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम होण्याचा धोका वाढला आहे.

**गणेशोत्सवानंतर टंचाई**

गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिरे झाली होती. त्या काळात साठा भरून निघाला होता, परंतु त्यानंतरचा पाऊस, नंतरच्या सुट्ट्या आणि शिबिरांची अनुपस्थितीमुळे रक्तसंकलन थांबल्याने रक्त संकलनात मोठ्या अडचणी येत आहेत.

**नातेवाइकांची धावपळ**

मुंबई-पुणे दुतगती महामार्ग, सायन पनवेल महामार्ग, पनवेल-गोवा, अलिबाग, जेएनपीटी रस्त्याने अपघात होत असतात. या अपघातानंतर अशा गंभीर अपघातातील रुग्णांना रक्ताची मोठी गरज भासते. या रुग्णांना रक्ताची पिशवी मिळवण्यासाठी नातेवाइकांना धावपळ करावी लागत आहे.

**स्वेच्छेने रक्तदान करा!**

रक्ताची मागणी, तुटवडा यात मोठी तफावत निर्माण झाली आहे. यामुळे थॅलेसेमिया, गरोदर माता, अत्यावश्यक शस्त्रक्रिया, कर्करोग पीडित रुग्णांना रक्तपिशवी देण्यात अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

> **“ग्रामीण रुग्णालयात महिलांच्या प्रसूतीच्या शस्त्रक्रिया होतात. त्यासाठी अलिबाग येथील संकलन केंद्रातून रक्तपुरवठा होतो, परंतु सध्या रक्ताचा साठा अत्यल्प असल्याने अनेक तातडीच्या शस्त्रक्रियांचे वेळापत्रक बदलावे लागले आहे.**
> **– डॉ. अशोक गीते, अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, पनवेल”**

## डिझेल चोरी करणारे अटकेत

**रसायनी** : वडगाव-वाशिवली हद्दीमध्ये मुक्कामी आलेली एस.टी. बस क्रमांक एमएच २० डीएल २२७९ ही एस.बी. कंपनीसमोर उभी केली असताना अज्ञात चोराने १२,८०० रूपये किंमतीचे १४० लिटर डिझेल चोरून नेले. एस.टी. चालक बाबासाहेब तांदळे यांनी रसायनी पोलीस ठाण्यात डिझेल चोरीची तक्रार दिली असता रसायनी

पोलीस अज्ञात चोरट्याचा छडा लावत साहिल संतोष परदेशी (वय २४, रा. खोपोली), विश्वजीत जयसिंग कदम (वय १९, रा. काजूवाडी, खोपोली), साहिल रमेश लाड (वय २३, रा. दहीवली-कर्जत) तिघा चोरांना ताब्यात घेतले असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सह फौजदार कोळेकर अधिक तपास करीत आहेत.



## अनिल दाभाडे यांच्या चारोळ्यांनी कविसंमेलन गाजले

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रामशेठ ठाकूर सभागृहात रामशेठ ठाकूर विकास मंडळ पनवेल आणि कोमसाप शाखा पनवेल नवीन पनवेल यांच्या वतीने भव्य अशा कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कविसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध हास्य कवी अशोक नायगावकर, सुप्रसिद्ध कवी गीतकार अरूण म्हात्रे तसेच सुप्रसिद्ध गझलकार ए.के. शेख, पनवेल टाईम्सचे संपादक व कोमसाप नवीन पनवेलचे अध्यक्ष गणेश जी कोळी, माजी शिक्षण संचालक व गझलकार रोहिदास पोटे इत्यादी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर हजर होते. या संमेलनात साहित्यिक कवी लेखक चारोळीकार अनिल दाभाडे यांनी विविध विषयांवर चारोळ्या सादर केल्या. उपस्थित रसिकांनी चारोळ्यांना टाळ्यांचा कडकडाट करून दाद दिली. या कवि संमेलनाचे निवेदन प्रज्ञा जाधव यांनी केले होते.

## क्षयरोगींना पोषण आहार

**पनवेल** : आपल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत, दिपक फर्टीलाझर्स अँण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी पनवेल महानगरपालिका यांच्या सहकार्याने आज अर्बन प्रायमरी हेल्थ सेंटर, कळंबोली येथे २०० क्षयरोगी रुग्णांना पोषण आहार किटचे वितरण केले. या वितरण कार्यक्रमाला राजशेखर बोंथा आणि डॉ. उषा राठोड उपस्थित होते. या उपक्रमाचा उद्देश क्षयरोगी रुग्णांच्या लवकर बरे होण्यासाठी पोषण सहाय्य उपलब्ध करून देणे आहे. सहा महिन्यांपर्यंत हा उपक्रम सुरू ठेवणार असून, आरोग्य क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी दृढ करत आहे. पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या क्षयरोगमुक्त भारत अभियानात योगदान देत आहे.

## ३५ वर्षांनंतरही पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत

### शेवा गावाच्या ग्रामस्थांचा संताप शिगेला

**। उरण । प्रतिनिधी ।**

जे.एन.पी.टी. प्रकल्पासाठी १९८६ मध्ये उखडून टाकलेले शेवा गाव आज ३७ वर्षांनंतरही पुनर्वसनाच्या प्रतीक्षेतच आहे. महाराष्ट्र शासनाच्या १५ जानेवारी १९८८ च्या राजपत्रानुसार ३३.६४.०५ हेक्टर जमिनीवर संपूर्ण ३६४ विस्थापितांचे पुनर्वसन करणे आवश्यक असतानाही प्रत्यक्षात फक्त १० हेक्टरवर तात्पुरती विस्थापितांची मांडवली करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी उसळली आहे.

उपअधीक्षक भूमीअभिलेख, उरण यांनी या संपूर्ण संपादित क्षेत्राची आकारबंध नोंद, हद्द मोजणी, नकाशा तयार करून तहसील कार्यालयास अहवाल दिलेला असतानाही विस्थापितांना आजतागायत भूखंडाचे अधिकृत वाटप, नवीन ७/१२, मालकीहक्क तसेच नागरी सुविधांची कागदपत्रे देण्यात आलेली नाहीत.

इतकेच नव्हे, जे.एन.पी.टी. ने २०१६ मध्ये संपादित ३३.६४.०५ हेक्टर क्षेत्र महाराष्ट्र शासनाकडे सुपूर्द केल्याचा दाखला देऊनही आजपर्यंत पुनर्वसन प्रक्रियेवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या गंभीर प्रश्नावर माजी आमदार मनोहर भोईर यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत प्रतिनिधींनी जे.एन.पी.टी.चे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांच्यासोबत चर्चा केली असता ‘पुनर्वसनासाठी आवश्यक निधी किंवा जमीन सिडकोला देण्यास आम्ही तयार आहोत,’ अशी भूमिका जे.एन.पी.टी.ने स्पष्ट केली होती. मात्र, त्यानंतर प्रशासनाकडून कोणतीही गती दिसली नाही.

या सर्व प्रलंबित प्रक्रियेच्या विरोधात नवीन शेवा गाव ग्रामपंचायत समिती, अध्यक्ष कमळाकर बबन पाटील व सर्व ग्रामस्थांनी १७ नोव्हेंबरपासून उरण तहसील कार्यालयासमोर ‘बेमरण उपोषण’ सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.नवीन शेवा गावाचे ३३.६४.०५ हेक्टरमधील कायदेशीर पूर्ण पुनर्वसन होईपर्यंत आम्ही मागे हटणार नाही. आणि, या आंदोलनाचे सर्व परिणाम तहसीलदार, जिल्हाधिकारी व जेएनपीटी प्रशासनाला स्वीकारावे लागतील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## मधुकर घाणेकर यांचे निधन

**म्हसळा** : बनोटी गावचे सुपुत्र मधुकर नावजी घाणेकर यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा मुलगी आणि नातवंडे असा परिवार आह. त्यांच्या अंत्यदर्शनाला पंचक्रोशीतील



अनेक मान्यवर उपस्थित होते. गावात शाळा चालू करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गावातील भीषण पाणी टंचाईच्या काळात त्यांच्या पुढाकाराने पाणी योजना राबविली गेली. पंचक्रोशीत नाट्य परंपरा सुरु करुन नवीन पायंडा सुरु केला. त्यांनी पाचगाव आगरी समाज संघटना स्थापन करुन समाजाला एकत्र आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## दादा, भाऊ, शेठची समाजमाध्यमांवर भाऊगर्दी

**। पाली । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या तारखा अजून जाहीर व्हायच्या आहेत. मात्र असंख्य इच्छुक उमेदवारांनी यासाठी आत्तापासूनच कंबर कसली आहे. अनेकांनी थेट समाज माध्यमांवर आपणच इच्छुक उमेदवार असल्याचे जाहीरदेखील केले आहे. शिवाय रोजच्या रोज यासंदर्भात आपल्या कामांच्या पोस्ट, तसेच विविध फोटो आणि व्हिडिओ पोस्ट केले जात आहेत. समाज माध्यमांवर अशा इच्छुक उमेदवारांची भाऊगर्दी पहायला मिळत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्यालाच तिकीट मिळावे यासाठी हे उमेदवार समाज माध्यमांचा अतिशय प्रभावीपणे वापर करताना दिसत आहेत. या माध्यमातून ते आपली लोकप्रियता आणि जनतेच्या मनाचा कौल देखील तपासत आहेत. शिवाय पक्षश्रेष्ठींपर्यंत आपल्या मनातील इच्छा या माध्यमातून पोहोचवली जात आहे. काहींनी तर स्वतःला दादा, भाऊ, साहेब व शेठ अशा उपाधीदेखील लावल्या आहेत. त्यांच्या पोस्टला येणाऱ्या कमेंट्स विनोदीदेखील पाहायला मिळतात. परिणामी, अनेकांचा विरंगुळादेखील होतो. काही उमेदवारांनी तर आपल्यालाच तिकीट मिळणार असे समाज माध्यमांवर थेट जाहीरच करून टाकले आहे. तर काहींनी उमेदवारी न मिळाल्यास बंडाची भाषा देखील केली आहे. तर या इच्छुक उमेदवारांचे कार्यकर्ते व चेले चपाटेदेखील या पोस्ट विविध माध्यमात शेअर करताना दिसत आहेत.

### मनोरंजन व वाद

सत्तेत असताना किंवा नसताना केलेली कामे, राबविलेल्या योजना व उपक्रम यांचे फोटो, व्हिडिओ व माहिती प्रसारित केली जात आहे. याशिवाय अनेकजणांनी आपला अजेंडाही समाज माध्यमावर प्रसारित करत आहेत. यावर चांगल्या-वाईट प्रतिक्रिया उमटत आहेत. काही उमेदवार व कार्यकर्ते समाज माध्यमांद्वारे तत्कालीन सत्ताधाऱ्यांचा भ्रष्ट कारभार समोर आणत आहेत. या सगळ्यात सर्वसामान्य नागरिक व मतदारांचे चांगलेच मनोरंजन होत आहे. मात्र काही वेळेला समाज माध्यमांवरील वाद शिगेलाही जात आहे.

### तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

निवडणुका गाव-खेड्यातील असल्या तरी प्रचारासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर सर्वांकडूनच होताना दिसतो. इच्छुक उमेदवारांनी डिजिटल बॅनर व व्हिडिओ तयार केले आहेत. ते सोशल मीडियावर पोस्ट करतात. शिवाय, पाच वर्षांतील कामांचा लेखाजोखाही समाज माध्यमावर मांडला जात आहे.

## लाडकी बहीण योजनेतून डच्चू?

ई-केवायसी सक्तीचे केल्याने तालुक्यातील हजारो महिलांची पात्रता धोक्यात आली आहे. अंतिम मुदत १८ नोव्हेंबर असल्याने ठराविक कालावधीत केवायसी पूर्ण न करणाऱ्या लाडक्या बहिणींना पुढील महिन्यापासून कोणताही लाभ मिळणार नाही. महिलांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, फायदा देताना अटी नाहीत, पण बंद करताना शेकडो अडथळे आणले जात आहेत, अशी भावना व्यक्त होत आहे.

## नेरळ परिसरातील गो-तस्करी प्रकरण उघडकीस

केला असून भिवंडी येथून एकास ताब्यात घेतले आहे.या दोन्ही गंभीर प्रकरणांचा तपास वेगाने करत नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने केवळ आठ दिवसांत आरोपींपर्यंत पोहोचण्यास यश मिळवले. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिस उपनिरीक्षक सुशील काजोळकर तसेच कर्मचारी वाघमारे,राजेश केकाण, बेंद्रे,विनोद वांगणेकर यांनी भिवंडी येथील कसाई पाड्यात धाड टाकत एका प्रमुख आरोपीला अटक केली.या प्रकरणात पोलिसांकडे सुरुवातीला ठोस पुरावे नसतानाही नेरळ पोलिसांनी सातत्यपूर्ण तपास करत मोठे यश मिळवले. विशेष म्हणजे अंजप येथील तस्करी प्रकरणाने तर जिल्हा पातळीवरही खळबळ उडवली होती. रायगड जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी स्वतः या गुन्ह्याचा आढावा घेत तपासाला वेग देण्याच्या सूचना दिल्या होत्या.

## ढिगाऱ्याखाली मजुरांचा मृत्यू

३ कामगार जखमी असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमी कामगारांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. या दुर्घटनेमुळे भायखळा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी कामगारांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पोलिसांनी याप्रकरणी पुढील तपास सुरू केला आहे.

## धावत्या बसला आग; ५० प्रवासी बचावले

मात्र, आग एवढी भीषण होती की बसचे फक्त सांगाडे शिल्लक राहिले. प्रवासी सुरक्षित असल्याची खात्री होताच स्थानिक ग्रामस्थांनीही सुटकेचा निश्वास सोडला. प्राथमिक तपासानुसार बसमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यानं ही आग लागली असावी, असा अंदाज आहे. तांत्रिक तपास सुरू असून बसमधील विद्युत यंत्रणेमध्ये बिघाड का झाला? याचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, या घटनेमुळे नागपूर-उमरेड मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. जळालेल्या बसमुळे रस्ता अडकल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी तत्परता दाखवत रस्त्यावरील कोंडी दूर केली आणि वाहतूक पुन्हा पूर्ववत केली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून, चालकाच्या सतर्कतेचे सर्व स्तरांतून कौतुक केलं जात आहे. नागपूर जिल्ह्यात मागील काही दिवसांत वाहनांमधील शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याच्या घटना वाढत असल्यानं, अशा वाहनांची तांत्रिक तपासणी काटेकोरपणे होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## पूर्वप्राथमिक शिक्षण धोरण लालफितीत

शिक्षण विभाग अयशस्वी ठरला आहे. असे असतानाच आता पुढील शैक्षणिक वर्षातही हे धोरण लागू होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. राज्यातील विनाअनुदानित खासगी शाळांच्या

पान १ वरून

२०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील पूर्वप्राथमिक प्रवेशप्रक्रियेने वेग धरला असून, आता नामांकित शाळांचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रियादेखील सुरू झाली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर मेमध्ये राज्यात पूर्वप्राथमिकच्या अभ्यासक्रमाला मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार राज्यातील तीन ते सहा वर्षांच्या बालकांसाठी आधारशिला बालवाटिका १, २, ३ असा अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) राज्यात पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी आधारशिला अभ्यासक्रम तयार केला आहे. परंतु, राज्यात पूर्वप्राथमिकच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी झालेली नाही. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये पूर्वप्राथमिकच्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशास सुरुवात होते. किंबहुना या अनुषंगाने ही प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी राज्य सरकारमार्फत पूर्वप्राथमिक शिक्षणाचे धोरण निश्चित होऊन अंमलबजावणीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना जाहीर होणे अपेक्षित होते. परंतु, हे अद्याप न झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे.पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या नावाखाली खासगी शाळांकडून पालकांची लूट सुरू आहे. पूर्वप्राथमिक शिक्षण, प्रवेशप्रक्रिया, शुल्क याबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना आणि निकष नसल्याने खासगी शाळांकडून पालकांची दिशाभूल होत आहे. खासगी शाळांची २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली असताना, प्रवेश अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरून घेतले जात आहेत. पूर्वप्राथमिक शिक्षणातील अनागोंदी कारभार थांबविण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने लवकरात लवकर हे धोरण निशचित करून त्याच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना जाहीर कराव्यात. असे दीपाली सरदेशमुख म्हणाल्या.

## पेण अर्बन बँकेच्या संचालकांकडून वसुली?

प्रक्रियेत रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाला उत्तरार्थी म्हणून समाविष्ट करण्याची मागणी महासंघाने १५ नोव्हेंबर रोजी लेखी स्वरूपात केली आहे.बँकेचे संचालक शिशिर धारकर, जयवंत गुरव, जयंतीलाल पुनामिया, संतोष शृंगारपुरे, मिलिंद पाडगावकर, हरिश्चंद्र पाटील, अनिल डेरे, तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुरुषोत्तम जोशी, गिरिष गुप्ते, दिनेश सावंत आणि संगणक ऑपरेटर अजय मोकल यांचाही या घोटाळ्यात सहभाग असल्याची नोंद चौकशीत करण्यात आली आहे. या २५ जणांवर ५९७ कोटी रुपयांची थेट व वैयक्तिक वसुली लादण्यात आली आहे.पेण अर्बन बँकेचे १ लाख ४९ हजार ठेवीदार मागील १५ वर्षांपासून आपल्या ठेवी परत मिळविण्यासाठी संघर्ष करीत आहेत; मात्र फक्त सहा कोटी रुपयांचीच वसुली झाल्याचे समोर आले आहे. पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेने ७५८ कोटींचा घोटाळा, तर मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे आणखी ४८० कोटी रुपये बुडविल्याची नोंद आहे. दहा हजार रुपये आणि त्यानंतर २५ हजार रुपयांपर्यंतच्या ठेवीदारांना पैसे परत मिळालेले असले, तरी ही टक्केवारी केवळ १० टक्केच आहे. रुपये एक लाखपर्यंत ठेवीदारांना पैसे देण्याची खात्री गेल्या चार वर्षांपासून अमलात आलेली नाही. परिणामी, उर्वरित ८० टक्के ठेवीदारांचे भवितव्य अधांतरीच आहे. मागील १५ वर्षांपासून ठेवी मिळविण्यासाठी ग्राहक सतत संघर्ष करीत आहेत; मात्र विशेष कृती समितीकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेन जाधव यांनी केला आहे.

## दिव्यांग संस्थांवर होणार कारवाई?

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ५१ व ५२ अन्वये नोंदणी करणे बंधनकारक असून, नोंदणी न केलेल्या संस्थांवर कलम ९१ नुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व दिव्यांग सेवा देणाऱ्या संस्थांना ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

## डॉक्टरने केला महिलेचा विनयभंग

संबंधांसाठी दबाव टाकला. या संबंधांमुळे अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिल्याचे समोर आले असता कुटुंबियांनी मोठा धक्का बसला. सामाजिक दबाव, भीती आणि मानसिक आघातामुळे मुलगी दीर्घकाळ मौनात होती. घटनेची गंभीरता लक्षात घेता पीडितेच्या आईने वडखळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवत आरोपीवर कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक १५४/२०२५ नुसार खालील गंभीर गुन्ह्यांत आरोपीला अटक करण्यात आली आहे. भारतीय दंड संहिता कलम ६४(२), अधिनियम २०१२ चे कलम ४ आणि ६,बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ चे कलम ९ कायद्यानुसार अल्पवयीन मुलीशी शरीरसंबंध ठेवणे हा कठोर दंडनीय गुन्हा असून, दोष सिद्ध झाल्यास आरोपीला दीर्घ मुदतीची शिक्षा होऊ शकते. वडखळ पोलीस अधिक तपास करत असून, पीडितेला वैद्यकीय उपचार व समुपदेशनाची मदत दिली जात आहे. समाजातील वाढत्या अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांच्या घटनांनी पालक व प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थांवर पुन्हा प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

## भावा-बहिणीचा बुडून मृत्यू

अशी मृतांची नावे आहेत. या घटनेमुळे डाऊच खुर्द परिसरासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. डाऊच खुर्द येथील गणपत बडे यांचा मेंढीपालनाचा व्यवसाय आहे. शनिवारी त्यांचा मुलगा सार्थक आणि मुलगी सुरेखा हे चांदेकसारे परिसरात जुन्या खोदकाम केलेल्या खाणीजवळ मेंढ्या चारत होते. मेंढ्या पाणी पिण्यासाठी खाणीजवळ गेल्या असता, त्यातील एक मेंढी पाण्यात पडली. मेंढीला वाचवण्यासाठी सुरेखाने प्रयत्न केले, मात्र या प्रयत्नात तिचा तोल गेला आणि पाय घसरल्याने ती खाणीच्या खोल पाण्यात बुडू लागली. बहिणीला बुडताना पाहून भाऊ सार्थक याने क्षणाचाही विलंब न करता तिला वाचवण्यासाठी खाणीत उडी घेतली. मात्र, खाणीत जास्त पाणी आणि दलदल असल्यामुळे दोघेही घाबरल्यामुळे ते दोघेही पाण्यात बुडाले. आजूबाजूला कपडे धुण्यासाठी थांबलेल्या काही महिलांच्या हा प्रकार लक्षात येताच त्यांनी तातडीने आरडाओरड करून नागरिकांना याबाबत कळवले.

## निकष पूर्ततेकडे विद्यापीठांची पाठ

नियुक्तीची स्थिती, सरळसेवा नियुक्ती रिक्त पद स्थिती, बिंदुनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, आयजीओटी पोर्टलवर नोंदणी आणि पाच अभ्यासक्रम पूर्ण करणे, सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करून डिजिटल करणे या निकषांवर मूल्यांकन करण्यात आले.राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाने सर्वाधिक ६८ गुणांसह क्रमवारीत अग्रस्थान पटकावले. तर मुंबई विद्यापीठ आणि कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने प्रत्येकी ६६ गुण मिळवले.अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाला ६२, नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला ६०, मुंबईच्या एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाला ५७, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला ५६, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाला ५४, रामटेक येथील कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाला प्रत्येकी ५२, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला ५०, तर जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ४८ गुण मिळाले आहेत.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ४२ गुणांसह सर्वांत शेवटच्या स्थानी आहे. पुणे विद्यापीठाला आकृतिबंध, आयजीओटी पोर्टलवर नोंदणी व ५ कोर्स अभ्यासक्रम पूर्ण करणे, कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत व डिजिटल करणे या तीन गटांत १० पैकी शून्य गुण मिळाले आहेत.आकृतिबंध या निकषावर केवळ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या एकमेव विद्यापीठाला दहा गुण मिळाले असून, उर्वरित सर्व विद्यापीठांना शून्य गुण मिळाले आहेत. तर आयजीओटी पोर्टलवर नोंदणी व ५ अभ्यासक्रम पूर्ण करण्यात एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाला एक गुण, गोंडवाना विद्यापीठाला दोन गुण मिळाले असून, उर्वरित सर्व विद्यापीठांना शून्य गुण आहेत.

## चार मावश्यांनी भाच्याला संपवलं

महात्मा गांधी रुग्णालयातून नवजात बाळाच्या हत्येची माहिती मिळाली. आई सुमन आणि वडील पूनमराम यांनी त्यांच्या बहिणींवर नवजात बाळाच्या हत्येचा आरोप केला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे आणि नवजात बाळाच्या मावश्या असलेल्या चार आरोपी महिलांना ताब्यात घेतले आहे. शहरातील नेहरू कॉलनीतील रहिवासी पूनमराम यांनी सांगितले की त्यांची पत्नी सुमनने २४ ऑक्टोबर रोजी मुलाला जन्म दिला.शनिवारी पहाटे ३:३० च्या सुमारास, त्याला सुमनचा फोन आला, ज्यामध्ये त्याला कळवण्यात आले की तिच्या बहिणी, रामेश्वरी, ममता, गीता आणि मंजू यांनी त्याच्या मुलाला मारले आहे. एकीने मुलाच्या शरीरावर उडी मारली आणि नवजात बाळाची हाडे मोडली. पूनमरामने सांगितले की त्याने त्याच्या दुसऱ्या मुलाचे नाव प्रत्युष ठेवले आहे. माझ्या नातवाची हत्या मत्सरातूनपूनमचा आरोप आहे की त्याच्या सर्व मेहुण्या त्याचा मत्सर करत होत्या. सुमनच्या कुटुंबात सात भावंडे आहेत. त्यापैकी पाच अविवाहित आहेत. एक मोठी बहीण विवाहित आहे, पण ती तिच्या आईवडिलांच्या घरी राहते. सुमन तिच्या सासरच्या घरी राहत असताना, यामुळे तिच्या आईवडिलांच्या घरी मत्सर निर्माण झाला. आजोबा राजुराम असाही आरोप करतात की सुमनच्या कुटुंबाने मत्सरातून त्याच्या नातवाची हत्या केली.

## गेट टुगेदर ठरले अखेरचे

हॉटेलमध्ये थांबले होते. शुक्रवारी दुपारच्या सुमारास आनंद अय्यर यांच्या छातीत अचानक तीव्र वेदना सुरू झाल्या. त्यानंतर मित्रांनी घाईघाईने त्यांना हॉटेल कर्मचाऱ्यांच्या मदतीने रिक्षात बसवून शिंदे हॉस्पिटलकडे रवाना केले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे शेतकरी भवनाजवळ पोहोचताच त्यांच्या रिक्षाचा टायर अचानक फुटला, त्यामुळे या गंभीर परिस्थितीत मित्रांची अधिकच तारांबळ उडाली. त्याच वेळी योगायोगाने त्या मार्गाने रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल जात होत्या. परिस्थितीचं गांभीर्य ओळखून त्यांनी तात्काळ गाडी थांबवली आणि आपल्या सोबत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याद्वारे दुसरी रिक्षा बोलावून आनंद अय्यर यांना तात्काळ जिल्हा रुग्णालयाकडे रवाना केले. मात्र दुर्दैवाने रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच आनंद अय्यर यांची प्राणज्योत मालवली होती.अहमदाबाद येथून आलेल्या त्यांच्या मित्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अय्यर यांना पूर्वी सौम्य हृदयविकाराचा त्रास होता. परंतु अचानक आलेल्या झटक्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली आणि उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले. त्यांचे कुटुंबिय, विशेषतः मुलगा मुंबईहून येत असून त्याच्या उपस्थितीत पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. अनपेक्षित मृत्यूमुळे सोबत आलेल्या सहकाऱ्यांवरही शोककळा पसरली आहे. वीस वर्षांनंतर झालेल्या या आनंदाच्या मेळाव्याचा एका मन हेलावणाऱ्या प्रसंगाने समारोप झाला.

## कर्जत नपच्या निवडणुकीसाठी ५६ उमेदवारी अर्ज दाखल

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी पाचव्या दिवशी पहिला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. त्यानंतर सहाव्या दिवशी दोन आणि आज सातव्या दिवशी तब्बल ५६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. आजपर्यंत एकूण ५९ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. हे अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्याकडे दाखल केले. कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उद्याचा अवघा एक दिवस शिल्लक आहे. काहींनी ऑनलाईन उमेदवारी अर्ज दाखल केले. आज नगराध्यक्ष पदासाठी कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी पुष्पा हरिश्चंद्र दगडे यांनी आपले दोन उमेदवारी अर्ज दाखल केले. तसेच एक ते दहा प्रभागांमध्ये ५४ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये अपक्ष उमेदवारांनीही अर्ज दाखल केले. आज प्रामुख्याने माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, माजी नगरसेवक अशोक राऊत, संतोष पाटील, बिनिता घुमरे, अरुणा वायकर आदींचा समावेश आहे. बिनिता घुमरे यांना भारतीय जनता पक्षाने उमेदवारी न दिल्याने त्यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून प्रभाग सात मध्ये कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला.उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सोमवार (दि. १७) शेवटचा दिवस आहे. यामुळे नगरसेवक आणि नगराध्यक्ष बनण्याची इच्छा ठेवणाऱ्यांचे उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.

## निवडक



### गौळवाडी नजीक गाडी पलटली

**सुतारवाडी** : गवलवाडी नजीक शनिवारी (दि.१५) रात्री साडेआठच्या सुमारास पर्यटकांची गाडी उलटण्याची घटना घडली. वाहनचालकाला येथील वळणाचा अंदाज न आल्यामुळे मोरी तोडून गाडी पलटी झाली. या अपघातात चालक जखमी झाला असून त्याला उपचारासाठी दवाखान्यात हलविण्यात आले आहेत. या भागामध्ये अनेक फार्म हाऊस असून सातत्याने पर्यटक ये-जा करत असतात. चालकाचा येथील वळणाचा अंदाज नसल्यामुळे अनेक वेळा अपघात होत असतात. दरम्यान, या अपघाताची माहिती मिळताच शिवशंभो ज्येष्ठ नागरिक संघ सुतारवाडीचे अध्यक्ष मनोहर साळवी तसेच धाकल्या बुवा यांनी सहकार्य केले.

### खड्डेमय प्रवासाला पूर्ण विराम

**पाताळगंगा** : माजगाव स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता



खड्ड्यातून जात असल्यामुळे अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. त्यामुळे या ठिकाणी रस्ता होणे गरजेचे असल्यामुळे सरपंच दिपाली पाटील यांच्या माध्यमातून आणि पंचायत समिती सेझ फंडातून या ठिकाणी क्रॉक्रीटिकरण करण्यात आले. त्यामुळे येथील ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत. पाताळगंगा नदीच्या किनाऱ्यालगत असलेल्या या स्मशान भूमीकडे जाताना खड्डेमय रस्त्यातून प्रवास करावा लागत होता. सरपंच दिपाली पाटील या स्वतः या ठिकाणी उभ्या राहून हे काम पूर्ण केले. ग्रामसेवक संदीप धारणे, माजी उपसरपंच अपर्णा शिंदे तसेच सर्व सदस्यांच्या मोलाच्या योगदानातू हे काम यशस्वी रित्या पूर्ण झाल्यामुळे ग्रामस्थ सूधान व्यक्त करीत आहेत.



### टॅक्स भरूनही खड्ड्यांचा वनवास

**पनवेल** : शहरातील गावदेवी मंदिर ते आगरी समाज सभागृह दरम्यानचा रस्ता अक्षरशः खड्डेमय बनला आहे. त्यामुळे नागरिकांना नाहिलाजास्तव या खड्डयेमय रस्त्यातून मार्गक्रमण करावे लागत आहे. टॅक्स भरूनही खड्ड्यांचा वनवास आम्ही का सोसायचा, असा सवाल पनवेलकर उपस्थित करत आहेत. या खड्ड्यांमुळे अनेकांना पाठदुखीचा त्रास जाणवत आहे. महिलांसाठी व विशेषकरून गरोदर महिलांना रुग्णालयात जाताना हा रस्ता अधिक धोकादायक ठरत आहे. याआधी पालिका प्रशासनाने या मार्गावर प्लास्टिक रोडचा प्रयोग केला होता; मात्र, तो प्रयोग पूर्णपणे फेल ठरल्याने नागरिकांचा रोष अधिकच वाढला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालिका अधिकारी पाहणी करून छायाचित्रे घेत असले तरी प्रत्यक्ष कामाचा वेग मंदच असून दिवाळीही संपली; मात्र, खड्ड्यांचे संकट अद्यापही टळलेले नाही.



### जनजातीय गौरव कार्यक्रम संपन्न

**रसायनी** : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे भगवान बिरसा मुंडा जन्मशताब्दी वर्षा निमित्त दि.१ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत जनजाती गौरव पंधरवडा साजरा केला गेला. या निमित्ताने शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे व आदिवासी नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सर्व इयत्ताच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन सुंदर सादरीकरण केले. यावेळी वडगाव आदिवासी वाडीतील ग्रामस्थ, पालक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान वैजनाथ जाधव यांनी वारली चित्रकला विषयी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी भारतातील जनजाती विषयी मार्गदर्शन करत त्यांचा सांस्कृतिक वारसा मांडला. तसेच, भगवान बिरसा मुंडा यांचा नारा व त्यांचा जल, जंगल आणि जमीन यासाठीचा संघर्ष विद्यार्थ्यांना सांगितला.

# उरणमध्ये पहिल्यांदाच ‘बेस्ट’ सेवा

- अनेक वर्षांपासूनची मागणी पुर्ण
- उरण ते अटल सेतू मार्गे कुलाबा, उरण ते नवी मुंबई या मार्गावर बस धावणार



## तुषार गायकवाड यांच्या प्रयत्नांना यश

**| उरण | प्रतिनिधी |**

**उरण तालुका दळण-वळणाच्या दृष्टीने आता विकसित होत चालला आहे. उरणला नुकतीच रेल्वे सेवा सुरु झाली आहे. तसेच, लवकरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ देखील सुरु होणार आहे. दरम्यान, उरणमधून मुंबईतील कुलाबा व नवी मुंबई जाण्यासाठी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेची बेस्ट सेवा सुरु करण्यात यावी, अशी अनेक वर्षांपासूनची नागरिकांची मागणी होती. ती मागणी आता पूर्ण झाली आहे. उरणमधील द्रोणागिरीतील सामाजिक कार्यकर्ते तुषार गायकवाड यांनी उरण ते अटलसेतू मार्गे मुंबई या मार्गावर बेस्ट बस सेवा सुरु करण्यासाठी बेस्ट प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला आता यश आले असून बेस्ट प्रशासनाने उरण ते बांद्रा स्टेशन (पुर्व), उरण ते अटलसेतू मार्गे कुलाबा व उरण ते वाशी अशी बस सेवा सुरु केली आहे.**

उरणच्या इतिहासात पहिल्यांदाच नवी मुंबईची बेस्ट सेवा उपलब्ध झाली असून उरण ते नवी मुंबई व मुंबई अशी ही बस सेवा सुरु झाली आहे. त्याचे श्रेय उरणकरांनी सामाजिक कार्यकर्ते तुषार गायकवाड यांना दिले आहे. शुक्रवारी (दि.१४) सकाळी ९ वाजता द्रोणागिरी सेक्टर १२ येथून पहिली व दुसरी बस मुंबई व नवी मुंबईकडे रवाना झाल्या. या बसेसचे स्वागत तुषार गायकवाड यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संघाचे अध्यक्ष नामदेव कुरणे, भूपाळी सोसायटीचे अध्यक्ष दिनेश पवार, भैरवी सोसायटी अध्यक्ष नवनाथ डोके,लक्ष्मण मोटे, तुकाराम खंडागळे, सोसायटीतील नागरिक व ग्रामस्थांनी केले. तर, बेस्ट प्रशासनाच्यावतीने परिवहन सेवा चलो बस सेवेचे इन्स्पेक्टर भागवत कांबळे व प्रमोद कोकरे उपस्थित होते.

उरणला एसटी महामंडळच्या बसेसच्या फेऱ्या कमी आहेत. शिवाय त्या फेऱ्या वेळेत नाहीत. नागरिकांना कुठेही वेळेत प्रवास करता येत नाही. तसेच, रेल्वे सेवा फक्त नवी मुंबई पर्यंतच आहे. त्यामुळे दररोज उरण-मुंबई-उरण असा प्रवास करणाऱ्या शासकीय अधिकारी-कर्मचारी, खासगी कंपनीतील अधिकारी-कर्मचारी, व्यापारी व उद्योजकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. सध्या सिडको जेएनपीटी ते नवी मुंबई, मुंबई आणि ब्रांद्रा स्टेशन पुर्व असा प्रवास बेस्टच्या बसने करता येणार आहे. बस मार्गाचा नंबर चलो ॲपमध्ये दाखवत आहे. त्यामुळे उरणकरांच्या वेळेची बचत होणार आहे. उरणच्या इतिहासात पहिल्यांदाच बेस्ट बस सेवा सुरु झाल्याने नागरिकांनी, प्रवासी वर्गाने बेस्ट प्रशासनाचे व तुषार गायकवाड यांचे आभार मानले आहेत.

### प्रवाशांचा सुखकर प्रवास

ही ‘बेस्ट’ सेवा रविवार खेरीज सिडको जेएनपीटी ते नवी मुंबई, बांद्रा रेल्वेस्टेशन पूर्व व अटलसेतू मार्गे कुलाबा या मार्गावर सुरु करण्यात आली आहे. तसेच, सिडको जेएनपीटी ते वाशी, वाशी ते सिडको जेएनपीटी अशी स्वतंत्र बस सेवा सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे उरणकरांचा प्रवास वातानुकुलीत, आरामदायी, जलद आणि सुरक्षित होणार आहे.

### बससेवेचा लाभ घेण्यासाठी ‘चलो’ बंधनकारक

कोणत्याही नागरिकांना या बससेवेचा लाभ घ्यायचा असल्यास त्यांनी मोबाईलमध्ये ‘चलो’ बस ॲप डाउनलोड करून त्यात आपल्या प्रवासाची ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक आहे. अन्यथा बसमधून प्रवास करता येणार नाही. तसेच, बस तिकीटाची रक्कम ऑनलाईन बुकींग करतेवेळी दिसून येईल. ही बुकिंग २४ तास उपलब्ध आहे. त्याचबरोबर या बस सेवेचे वेळापत्रक देखील या ‘चलो’ बस ॲप वर पाहता येणार आहे. तसेच, या ॲपवर कोणती बस कुठे आहे, हे देखील त्वरीत कळते.

> **गेल्या अनेक वर्षांपासून उरणमधील नागरिकांना मुंबई व नवी मुंबईमध्ये प्रवास करताना अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे प्रवासी वर्गाच्या अडचणी कमी व्हाव्यात, प्रवाशांना कोणताही त्रास होऊ नये, त्यांना जलद व उत्तम सेवा मिळावी यासाठी माझे प्रयत्न चालू होते. बेस्ट प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार, पाठपुरावा सुरु होता. प्रवाशांची मागणी लक्षात घेता आता उरणमधून मुंबई व नवी मुंबई जाण्यासाठी बेस्ट प्रशासनाने बस सेवा सुरु केली आहे. त्यामुळे मी बेस्ट प्रशासनाचे आभार मानतो.**
>
> – **तुषार गायकवाड,** सामाजिक कार्यकर्ते, द्रोणागिरी

## कर्जतमधील घरकुलांचे बांधकाम रखडले



- अगामी निवडणूका समोर ठेवून भरमसाठ घरकुलांना मंजुरी
- लाडकी बहीण योजनेप्रमाणे पैसे लंपास केल्याची भावना

**| वेनगाव | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना, जनमन घरकुल योजना आणि रमाई घरकुल योजना राबवल्या जात आहेत. त्यातील प्रधान मंत्री आवास योजनेत प्रत्येकी १ लाख २० हजार रुपयांचा निधीची तरतुद असून या योजनेत १,८५३ घरकुल मंजूर झाली आहेत. त्यातील फक्त १४ घरकुल पूर्ण झाली असून १,८३९ घरकुल बाकी आहेत. तसेच, पूर्ण झालेल्या घरकुलांचे देखील शेवटचे बिल लाभार्थ्यास देण्याचे बाकी आहे. त्यानंतर आदिवासींसाठी असणारी जनमन घरकुल योजनेत प्रत्येकी २ लाख रुपये निधीची तरतुद आहे. या योजनेत १,८५३ घरकुलांना मंजुरी मिळाली असून त्यातील ८१ घरकुल पूर्ण झाली आहेत. तर, १,७७२ बाकी आहे. त्यातील काही घरकुलांचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा नसल्याने ते काम थांबले आहे. तसेच, रमाई घरकुल योजनेत प्रत्येकी १ लाख २० हजार रुपयांची तरतुद आहे. या योजनेत २५५ घरकुल मंजूर झाली आहेत. त्यापैकी २१५ कामे पूर्ण झाली असून ४० घरकुलांचे कामे निधी न मिळाल्याने थांबली आहेत.

दरम्यान, होऊ घातलेल्या पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणुका समोर ठेवून भरमसाठ प्रमाणात घरकुलांना मंजुरी देऊन भर पावसात सबंधित लाभार्थ्यांना मंजूर झालेले घरकुलांचे काम चालू करा, नाहीतर आलेले पैसे परत जातील, असे अधिकाऱ्यांमार्फत सांगण्यात आले होते. त्यामुळे त्यांना भर पावसात राहत असलेले घर मोडण्यास भाग पडले. आणि आता निधीअभावी घरकुलांची कामे रखडली आहेत. त्यासाठी लाभाथी ग्रॉम पंचायत व पंचायत समिती कार्यालयात फेऱ्या मारून पैसे कधी मिळतील, याची विचारणा करत आहेत. लाडकी बहीण योजने प्रमाणे, घरकुल योजनेचे पैसे लंपास केले की काय, अशी संभावना देखील व्यक्त केली जात आहे.

## श्रीवर्धनमध्ये पुन्हा गुटखा विक्री?

- तीन महिन्यानंतर माफियांनी पुन्हा डोके वर काढल्याची चर्चा

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन येथे ऑगस्ट महिन्यात ९८ हजार रूपयांचा गुटखा श्रीवर्धन पोलीसांनी जप्त केला होता. त्यामुळे गेले तीन महिने गुटखा माफियांनी श्रीवर्धन तालुक्यात गुटखा वितरण थांबवले होते. परंतु, पुन्हा गुटख्याचे वितरण सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्र शासनाने तंबाखू, निकोटीन आणि मॅग्नेशियम कार्बोनेट असलेल्या गुटखा, पान मसाला आणि सुगंधित तंबाखू उत्पादनांवर बंदी घातली आहे. श्रीवर्धन शहर व संपूर्ण तालुक्यातील निवडक टोबॅको दुकाने व टपरीवर सर्रास गुटखा विक्री सुरू होती. गेल्यावर्षी एप्रिल महिन्यात अन्न व औषध प्रशासन आणि श्रीवर्धन पोलीसांनी संयुक्त कारवाई करत काही टपऱ्यांवर धाड टाकीत मुद्देमाल जप्त केला होता. त्यानंतर तीन महिन्यांपूर्वी श्रीवर्धन पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एका गुटखा वितरकाच्या चारचाकीची झडती घेतली असता गुटख्याच्या पिशव्या मिळाल्या होत्या. या कारवाई नंतर काही महिने गुटखा माफियांनी वितरण थांबवले होते. परंतु, गेल्या काही दिवसांपासून गुटखा विक्री पुन्हा तेजीत सुरू झाली आहे.




> **गुटखा विक्री करणाऱ्यांवर पोलीस लक्ष ठेऊन आहेत. गोपनीय माहिती काढून कारवाई करत आहोत. नागरिकांकडे या बाबत काही माहिती असल्यास पोलिसांना कळवावे. श्रीवर्धन शहर व परिसर हे पर्यटन स्थळ आहे. महाराष्ट्राच्या विविध भागातून पर्यटक येत असतात. त्यामुळे ते गुटखा सोबत घेऊन येत असल्याची दाट शक्यता आहे.**
>
> – **उमेश पाटील,** पोलीस निरीक्षक, श्रीवर्धन

## ‘नशामुक्त उरण अभियान’

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण पोलीस विभागाने व्यसनमुक्त आणि सुरक्षित समाज निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण उपक्रम राबवला आहे. ‘नशामुक्त उरण अभियान’ या मोहिमेचा उद्देश व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, मदत उपलब्ध करून देणे आणि अल्कोहोल व ड्रग्जच्या व्यसनात अडकलेल्या व्यक्तींना मार्गदर्शन करणे हा आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस आणि नार्कोटिक्स ॲनॉनिमस यांच्या मोफत मदतीसाठी सूचना व मार्गदर्शन फलक उरण परिसरातील प्रमुख ठिकाणी बसविण्यात आले आहेत. हे अभियान अधिक प्रभावी करण्याचे आवाहन उरण पोलीस विभागातर्फे सर्व नागरिकांना करण्यात आले आहे.

## सरस्वती वार्षिक सर्वसाधारण सभा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कळंबोलीतील सरस्वती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेची आणि सरस्वती महिला नागरी सहकारी पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.१५) पार पडली. यावेळी महिलांना व्यवसायाची माहिती देण्यात आली. सरस्वती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था ही महिलांसाठी काम करते. त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अनेक वर्ष उपक्रम राबवत आहे. अशाच प्रकारे कळंबोली येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महिलांनी साडीचा व्यवसाय करावा, त्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आवाहन अध्यक्ष कुंदा गोळे यांनी केले.

## संदेरी जंगलात आढळली ‘वाघाटी’

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा तालुक्यातील संदेरी परिसरात मंगळवारी (दि.१२) सकाळच्या सुमारास एका शेतकऱ्याला दोन दुर्मळि ‘वाघाटी’ प्रजातींची पिल्ले आढळून आली. ही पिल्ले आढळताच स्थानिकांमध्ये सुरुवातीला बिबट्याच्या पिल्लांचा समज झाल्याने काही प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पशुधन विकास अधिकारी पूजा चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देत दोन्ही पिल्लांची पाहणी केली. तपासणीअंती ही पिल्ले आरोग्यदृष्ट्या सक्षम असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, ही पिल्ले बिबट्याची नसून ‘वाघाटी’ या संकटग्रस्त जंगली मांजरीच्या प्रजातीची असल्याचा खुलासाही वनविभागाच्यावतीने करण्यात आला.




‘वाघाटी’ ही जगातील सर्वात लहान जंगली मांजर प्रजातींपैकी एक असून तिचे वास्तव्य मुख्यतः झुडपी जंगले, गवताळ प्रदेश व खडकाळ भागात आढळते. तिचे खाद्य उंदीर, लहान सस्तन प्राणी, सरडे व लहान पक्षी असे असते. या प्रजातीचे अस्तित्व भारत,श्रीलंका आणि नेपाळमध्ये नोंदले जाते. वनपरिक्षेत्र अधिकारी संजय पांढरकामे यांनी सांगितले की, जंगललगतच्या वस्ती, आदिवासी पाडे व परिसरातील नागरिकांमध्ये वनसंपत्तीचे संवर्धन व संरक्षण याबाबत सातत्याने जनजागृती केली जात आहे. यावेळी संजय खांबेटे, वनपाल मांदाटणे, तुळशीराम चावरेकर, वनरक्षक प्रियांका जाधव, वनपाल वैभव शिंदे, सुभाष शिंदे, सचिन चव्हाण व प्रदीप कोरडे आदी उपस्थित होते.

**दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी मदत** | **रोटरी क्लबतर्फे सायकल वाटप**

## रोह्यातील विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ

**| चणेरा | प्रतिनिधी |**

ग्रामीण दुर्गम भागातील शाळा व महाविद्यालये टिकली पाहिजेत. उपेक्षित सामान्य कुटुंबातील विद्यार्थी याठिकाणी ज्ञानार्जन करतात, तसेच मोठे होण्याचे स्वप्न देखील बघतात. त्या विद्यार्थ्यांच्या पंखाना बळ देण्याचे काम करायला हवे. त्यातून राज्य व देशाच्या विविध क्षेत्रात विद्यार्थी चमकतील, असा आशावाद रोटरी क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष राजेंद्र पोकळे यांनी व्यक्त केला आहे. तसेच, क्लबच्या माध्यमातून दुर्गम भागातील शाळा व विद्यार्थ्यांसाठी भरीव मदत करण्याची व्यापक तरतूद करणार असल्याची भावना देखील त्यांनी व्यक्त केली. रोटरी क्लब ऑफ रोहाच्या माध्यमातून व प्रेस फ्रेंडब ग्रुपच्या प्रयत्नातून म्हसाडी, बारपे व महागांव विद्यालयातील विद्यार्थ्यांना शुक्रवारी (दि.१४) सायकलींचे




वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.


रोटरी क्लब ऑफ रोहा यांच्या माध्यमातून व प्रेस फ्रेंड ग्रुप यांच्या प्रयत्नातून रोहा तालुक्यातील कुणबी समाज विद्यालय म्हसाडी, तळा तालुक्यातील बारपे शाळा, महागांव येथील वरदायीनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. प्रारंभी म्हसाडी विद्यालयातील ४ विद्यार्थ्यांना सायकल वाटप केल्या. यावेळी नारायण पवार यांनी सांगितले की, म्हसाडी विद्यालय अत्यंत जिकरीने सुरु आहे. याठिकाणी आदिवासी, ठाकूर, कुणबी समाजातील विद्यार्थी ज्ञानार्जन करतात. येथून शिकून गेलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात नावलौकिक कमावत आहेत. तसेच, विविध संस्था व रोटरी क्लबने दिलेली मदत अनमोल आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांनतर सामाजिक कार्यकर्ते अमित घाग यांनी, दुर्गम भागातील शाळा व विद्यार्थ्यांना आधार देण्याची गरज आहे. त्या दृष्टीने आपणही नेहमीच प्रयत्नशील असतो. यापुढे शैक्षणिक क्षेत्रात मदत मळिवण्यासाठी अधिक प्रयत्न करू, असे सांगितले.

प्रेसफ्रेंडग्रुप अनेकदानत लोकांना शोधत असतो. त्यांच्याकडून शाळा व विद्यार्थ्यांना मदत दिली जाते. आज रोटरी क्लब ऑफ रोहा संस्थेने पुढाकार घेत विद्यार्थ्यांना सायकली दिल्याचे समाधान आहे, असे सांगत राजेंद्र जाधव यांनी आपल्या कविता, सामाजिक शैलीतून मुलांशी संवाद साधला. माजी विद्यार्थी जितेंद्र जाधव यांनी शाळेच्या जुन्या आठवणी सांगत सर्व मित्रांच्या सहकार्यातून माझ्या शाळेला, विद्यार्थ्यांना मदत मळिवता आली. त्यातून शाळेचे ऋण व्यक्त करतो, असे सांगितले. यावेळी बारपे शाळेला ३ सायकली, वरदायनी विद्यालयाला ७ सायकली, अशा एकूण १४ सायकलींचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला रोटरी क्लब अध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते आप्पा देशमुख, अमित घाग, रोटरीचे सचिव जयदेव पवार, खजिनदार भूषण लुमण, सतीश महाडीक, विक्रम जैन, डॉ. सुभाष म्हस्के, आशिष दळवी, राजेंद्र जाधव, नारायण पवार, लक्ष्मण साळवी, जनार्दन ढेबे, महेंद्र मोरे, रवींद्र कान्हेकर, जितेंद्र जाधव, समिधा आष्टीवकर, निलम सावंत, नंदकुमार बामुगडे व ग्रामस्थ, शिक्षकवृंद उपस्थित होते.

## आधार सेवा पूर्ववत करण्याची मागणी

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुडमध्ये सुरु असलेली आधार सेवा सध्या बंद असल्याने येथील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. ही गैरसोय लक्षात घेऊन दहा दिवसांत आधार सेवा उपलब्ध न झाल्यास त्या विरोधात तहसील कार्यालयासमोरील रस्त्यावर आंदोलन करू, असा इशारा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी रायगड जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे. हे निवेदन मुरूडचे नायब तहसीलदार संजय तवर यांनी स्विकारले. उदय सबनिस यांनी २०१३ सालापासून मुरूड येथे आधार केंद्राची सुरुवात केली होती. त्यांनी आधार केंद्र व महा



ई-सेवा केंद्र सुरू करून स्थानिक नागरीकांना अनेक शासकीय सेवा उपलब्ध करून दिल्या. तसेच, विविध शासकीय योजनांची माहिती देऊन नागरीकांना त्याचा लाभ मळिवून दिला. त्यानंतर २०२१ मध्ये उदय सबनिस यांना तहसिल कार्यालयातील एक खोली उपलब्ध करून देण्यात आली होती. परंतू, काही दिवसांपासून त्यांच्या आधार केंद्रवरील आधार नोंदणी बंद झाली आहे.

# बिहार आणि महाराष्ट्र

बिहारमध्ये भाजप व नीतीश यांच्या आघाडीला जे भयंकर यश मिळाले आहे ते भयचकित करणारे आहे. राक्षसी रीतीने विरोधकांची जी कत्तल झाली आहे त्यामागे नक्की काय आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न चालू आहे. नीतीश यांची महिलांमधील प्रतिमा, मोदींविषयीचे आकर्षण, योजनांचे यश अशा सर्व गोष्टींची बेरीज केली तरी जिंकण्याचा स्ट्राईक रेट (लढवलेल्या जागांच्या प्रमाणात जिंकलेल्या जागा) ८० ते ९० टक्के असू शकतो हेच धक्कादायक आहे. काँग्रेस वा राजद यांना खलास करून टाकावे इतकी खुन्नस लोकांमध्ये होती असे कोणालाही जाणवलेले नव्हते. खुद्द अमित शाह हेदेखील १६० जागा मिळतील असे भाकित करीत होते. त्याच्या वर सुमारे ४५ जागा जास्त मिळाल्या आहेत. यामागे नक्कीच काहीतरी गडबड आहे. पण जोपर्यंत ती सिध्द करता येऊ शकत नाही तोवर त्याविषयी बोलण्याला काही अर्थ नाही. निवडणुकीपूर्वी राहुल गांधी व तेजस्वी यादव यांच्या व्होटचोरीविरुध्दच्या सभांना मोठी गर्दी होत होती. पण आता मतदानात व मतमोजणीत व्होटचोरी होऊ नये यावर लक्ष ठेवणे ही काँग्रेस व राजदच्या कार्यकर्त्यांची जबाबदारी होती. तशा प्रकारची एकही तक्रार कोठेही दाखल झालेली नाही. राहुल यांचे आरोप दोन प्रकारचे होते. एक– मतदारयादीतून लाखो नावे आकसाने वगळली गेली आहेत व दुसरा– बोगस, दुबार, बाहेरच्या मतदारांची संख्या प्रचंड आहे. या दोन्ही गोष्टी पकडण्याची व पुराव्यानिशी सिध्द करण्याची संधी राहुल यांना बिहारमध्ये होती. पण असा एकही प्रकार समोर आलेला नाही. लाखो नावे वगळली गेली असती तर लोकांमध्ये किमान काही ठिकाणी असंतोष दिसला असता. बोगस मतदानाच्या किमान शंभर तरी केसेस झाल्या असत्या. तसे काही झालेले नाही. त्यामुळे आता याबाबतच्या आरोपांना राहुल यांनी तूर्तास स्थगित करायला हवे. पराभवाच्या इतर कारणांकडे पाहायला हवे. काँग्रेसची पक्षसंघटना अधिक मजबूत कशी होईल याकडे पाहायला हवे. सरकारविरुध्द अधिक ठोस मुद्दे घ्यायला हवेत.

### आघाडीत समन्वय हवा

बिहारच्या निकालांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर काय परिणाम होईल याची चर्चा सुरु आहे. विशेषतः नगरपरिषदा, जिल्हा परिषदा व पालिका निवडणुकीत याचे कसे पडसाद उमटणार याविषयी तर्क केले जात आहेत. बिहारसारख्या निकालांमुळे भाजप व मोदी हे सर्वशक्तिमान आहेत आणि त्यांना शरण गेल्याखेरीज पर्याय नाही अशी भावना बळावण्याची शक्यता आहेच. त्यातून मिडिया पूर्णपणे भाजपच्या कह्यात गेलेला आहे. भाजपची ताकद आहे त्याहून वाढवून घेण्यासाठीच तर त्याला सर्व पगार व जाहिराती मिळतात. त्या पैशांना तो पुरेपूर जागेल यात शंका नाही. विरोधक कसे आपसात भांडत आहेत, त्यांच्याकडे कसा काहीच कार्यक्रम नाही, याउलट महायुतीकडे सर्व कसे शिस्तीत चालू आहे असा आभास सध्याही निर्माण केला जात आहेच. वास्तविक ठाणे, सिंधुदुर्ग, नाशिक, पुणे, सातारा, नागपूर, संभाजीनगर, जालना अशा अनेक जिल्ह्यांमध्ये शिंदे गट व भाजप यांच्यात तुफान मारामाऱ्या चालू आहेत. पण मिडियामध्ये याचे प्रतिबिंब पडत नाही. तिथे कायम काँग्रेस एकट्याच्या बळावर लढणार, महाआघाडीत बिघाडी अशाच बातम्या चालतात. महाआघाडीने हे लक्षात घेऊन आपल्यातील समन्वय वाढवण्याची गरज आहे. बिहारमध्ये जे आज घडले ते महाराष्ट्रात गेल्या सालीच घडून गेले आहे. त्यानंतर प्रचंड बहुमताचे सरकार असूनही फडणवीस सरकारला धड कारभार करता आलेला नाही. भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर आली आहेत. फडणवीसांच्या गृह खात्यात वाटेल तशी हडेलहप्पी चालू आहे. कोठडीतील मृत्यूची प्रकरणे घडत आहेत. पुणे, नागपूरमध्ये दिवसाढवळ्या खून पडत आहेत. दलित, मुस्लिम यांना चेपण्याचा प्रयत्न चालू आहे. शेतकरी नाराज आहेत. यंदाच्या महापुरानंतरही शेतकऱ्यांना किरकोळ मदत मिळाली आहे. लाडकी बहीणमधील भ्रष्टाचाराची स्वतः सरकारनेच कबुली दिली आहे. विरोधकांनी डोके शांत ठेवून हे सर्व मुद्दे एकत्र केले व त्याभोवती प्रचार संघटित केला तर मतदार विरोधकांकडे येऊ शकेल. स्थानिक निवडणुका या तर अगदी स्थानिक प्रश्नांवर होत असतात. आपल्याकडे सर्वच शहरांमध्ये कचरा, रस्ते, वाहतूक, पाणी यांचे प्रश्न आहेत. भ्रष्टाचार बोकाळला आहे. विरोधकांना याबाबत आवाज उठवण्याची संधी आहे.

### भित्यापाठी ब्रह्मराक्षस

आज मिडियामध्ये शेतकऱ्यांचे किंवा भ्रष्टाचाराचे प्रश्न गायब आहेत. काँग्रेस मनसेसोबत जाणार का यावरच दिवसरात्र दळण दळले जात असते. वास्तविक मनसेची ताकद मुंबई, ठाणे, नाशिक अशा काही शहरांपुरतीच मर्यादित आहे. तूर्तास नगरपालिका व पंचायती आणि नंतर जिल्हा परिषदांच्या निवडणुका महत्वाच्या आहेत. त्यात काँग्रेस व महाआघाडी शक्य तिथे एकत्र लढेल व काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील हे उघड आहे. महायुतीमध्ये तर महाआघाडीपेक्षाही अधिक मैत्रीपूर्ण लढती होण्याची शक्यता आहे. या स्थितीत महाआघाडीच्या नेत्यांनी मिडियाच्या प्रचाराला किंमत न देता आपसातील सलोखा बळकट करायला हवा. मैत्रीपूर्ण लढती होत असल्या तरीही एकदम एकमेकांच्या विरोधात तलवारी उपसण्याची गरज नाही हे लक्षात घ्यायला हवे. बिहारच्या पराभवानंतर ठाकरे गटाच्या काही नेत्यांनी काँग्रेसवर टीकेची संधी साधली आहे. अशा जाहीर टीकेमुळे महायुतीचेच फावणार आहे. त्यामुळे ती टाळायला हवी. हे मतभेद पडद्याआड व्यक्त करता येतात. ते न केल्यास बिहारसारखा पालापाचोळा होऊ शकतो हे सर्वच पक्षांना कळायला हवे. यास्तव, महाविकास आघाडीतील सर्वच पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची एक तातडीची बैठक होण्याची गरज आहे. त्यात आगामी निवडणुकांच्या समन्वयासाठी समिती स्थापन करून निवडणुकीबाबतच्या निर्णयाचे बरेचसे अधिकार तिला देता येतील. स्थानिक पातळीवर स्थानिक युत्या होऊ शकतात हे सर्वांनी गृहित धरायला हवे. शरद पवार यांनी म्हटले आहे त्याप्रमाणे भाजप सोडून कोणाशीही प्रासंगिक युती करण्याची तयारी ठेवायला हवी. शिंदे, अजितदादांसह सर्व पक्षांचा खरा शत्रू भाजपच आहे. विरोधी महाविकास आघाडीचा तर आहेच आहे. हे जितक्या लवकरात लवकर यांच्या लक्षात येईल तितके बरे. काँग्रेस नेत्यांनी दिल्लीची गणिते विसरून जायला हवीत. मनसेशी तडजोड केली तर हिंदी भाषकांची मते मिळणार नाहीत हा भाजप व मिडियाने केलेला प्रचार आहे. काही काळापूर्वी मनसे भाजपसोबत होती, आताही तिने भाजपशी युतीची चाचपणी केली होती तरीही भाजपला बिहार, उत्तर प्रदेश या राज्यात काहीही फटका बसत नाही आणि काँग्रेसला मात्र तो बसतो हा अजब प्रचार आहे. भित्यापाठी ब्रह्मराक्षस म्हणतात तशातली काँग्रेसची गत आहे. भाजपला दणका देणे, त्याचा विजयरथ रोखणे हेच एकमेव उद्दिष्ट ठेवून महाविकास आघाडीची वाटचाल व्हायला हवी. तिचा कार्यक्रम, प्रचार, जागावाटप हे त्याच दिशेने गेले पाहिजे. जिथे जिथे जो भाजप व महायुतीला चांगली टक्कर देऊ शकेल त्याच्या पाठीमागे ताकद उभी करणे हाच एकमेव निकष असायला हवा.

विचार

# सोनेखरेदीत खबरदार, मोबाईल सेवा महागणार

*अलिकडच्या काळत समोर आलेली पहिली दखलपात्र बातमी म्हणजे डिजिटल सोन्याच्या गुंतवणुकीमध्ये काळजी घेण्याची गरज 'सेबी'तर्फे प्रतिपादीत करण्यात आली. दुसरी बातमी म्हणजे मोबाईलवर बोलणे महागणार असल्याची माहिती समोर आली. तर तिसरी बातमी म्हणजे परदेशी कंपन्यांचा भारतीय बाजारावरचा विश्वास कायम असल्याचे सिध्द झाले. या तीनही बातम्यांनी जनसामान्यांना सावध केले आहे.*



महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये तीन लक्षवेधी अर्थवार्ता समोर आल्या. सामान्यजनांसाठी त्या विशेष महत्वाच्या ठरल्या. पहिली म्हणजे डिजिटल सोन्याच्या गुंतवणुकीत काळजी घेण्याची गरज 'सेबी'तर्फे प्रतिपादीत करण्यात आली. दुसरी बातमी म्हणजे मोबाईलवर बोलणे महागणार असल्याची माहिती समोर आली. तर तिसरी बातमी म्हणजे परदेशी कंपन्यांचा भारतीय बाजारावरचा विश्वास कायम असल्याचे सिध्द झाले.

सोन्यातील गुंतवणूक काळानुसार बदलत आहे. दागिने, नाणी किंवा बार खरेदी तसेच डिजिटल गुंतवणूक वाढत आहे. तथापि, यामध्ये फसवणुकीचा धोका आहे. 'सेबी'ने दिलेल्या एका त्यामध्ये म्हटले आहे, की डिजिटल सोने आणि उत्पादने सिक्युरिटीज मार्केट फ्रेमवर्कमध्ये येत नाहीत. ते सेबी नोंदणीकृत गोल्ड ट्रेडेड फंड'(ईटीएफ) आणि इलेक्ट्रॉनिक सोन्याच्या पावत्यांपेक्षा वेगळे आहेत. 'सेबी'ने इशारा दिला आहे, की अनेक ऑनलाइन प्लॅटफॉर्म सध्या डिजिटल सोने किंवा ई गोल्डमध्ये गुंतवणूक करत आहेत; परंतु त्यांच्या नियमनाच्या अभावामुळे त्यामध्ये गुंतवणूक करणे जोखमीचे आहे. डिजिटल सोने 'सेबी'च्या नियमनाच्या अधीन नसल्याने डिजिटल सोने किंवा ई गोल्ड उत्पादनांमध्ये गुंतवणूक करताना कोणत्याही प्रकारची फसवणूक झाल्यास सेबी कोणतेही संरक्षण किंवा मदत प्रदान करणार नाही.

डिजिटल सोन्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सोने खरेदी करता किंवा विकता येते. मोबाइल ॲप्स किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्म वापरून डिजिटल सोन्याची गुंतवणूक सहज करता येते. आजकाल त्याचा जोरदार प्रचार केला जात आहे. या माध्यमामध्ये एक रुपयापासून गुंतवणूक सुरू करता येते. ही खरेदी किंवा विक्री बाजारभावानुसार करता येते. तथापि, अनेक डिजिटल सोने प्लॅटफॉर्म सेबी-नियमित नाहीत. त्यामुळे फसवणूक झाल्यास 'सेबी'कडडून कोणतेही संरक्षण मिळणार नाही. 'सेबी' म्हणते, की सोन्यात गुंतवणूक करायची असेल, तर 'सेबी'च्या नियमांमध्ये येणाऱ्या आणि कोणताही धोका नसलेल्या अनेक अस्तित्वात आहेत. 'सेबी' नोंदणीकृत मध्यस्थांद्वारे 'गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंड'(गोल्ड ईटीएफ), इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसिट्स (ईजीआर) आणि एक्सचेंज ट्रेडेड कमॉडिटी डेरिव्हेटिव्ह काँट्रॅक्टसमध्ये गुंतवणूक करू शकता. सध्या तनिष्क, फोन पे, कॅरेटलेन, एमएमटीसी पीएएमपी, जॉय अलुक्कास आदित्य बिर्ला कॅपिटल आणि श्रीराम फायनान्ससारख्या अनेक कंपन्या डिजिटल सोने विकत आहेत. तथापि, यामध्ये जोखीम घटकदेखील आहेत. कारण ते 'सेबी' नियंत्रित नाहीत. तथापि, तनिष्क आणि एमएमटीसी त्यांच्या वेबसाइटवर दावा करतात, की ते 'सेफगोल्ड ब्रँड' अंतर्गत डिजिटल सोने देतात. २४ कॅरेट शुध्द सोने खरेदी करण्याचा हा एक विश्वासार्ह मार्ग आहे. गुंतवणूकदार फक्त दहा रुपयांपासून गुंतवणूक सुरू करू शकतात.

दरम्यान, मोबाईल वापरणे महाग होणार असल्याची बातमी आहे. कारण आता एअरटेल, जिओ आणि वोडाफोन मोठ्या कंपन्या ग्राहकांना महागाईत झटका देण्याच्या तयारीत आहेत. रिचार्ज आणि डेटाच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोबाईल यूजर्सच्या खिशावर थेट परिणाम होणार आहे. तीन मोठ्या टेलिकॉम कंपन्या त्यांच्या रिचार्ज प्लानची किंमत वाढवण्याची तयारी करत आहेत. हा बदल डिसेंबर २०२५ पासून लागू होऊ शकतो. त्याचा परिणाम प्रीपेड आणि डेटा प्लॅन्सवर सर्वाधिक होऊ शकतो. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार टेलिकॉम कंपन्यांना मोठे कर्ज फेडण्यासाठी प्रति वापरकर्ता २०० रुपयांहून अधिक कमाई करणे आवश्यक आहे. मात्र सध्या ही कमाई सरासरी १८० ते १९५ रुपयांच्या दरम्यान आहे. एका अंदाजानुसार १९९ रुपयांचा प्लॅन २२२ रुपये, २९९ रुपयांचा २८ दिवस (दोन जीबी दर दिवस) चा प्लॅन, ३३०-३४५ रुपयांचा ८४ दिवसांचा दोन जीबी/दिवसाचा प्लॅन ९४९ रुपये ते ९९९ रुपयांपर्यंत महाग होऊ शकतो.

या दरवाढीमुळे ग्राहकांना दीर्घकाळाचे प्लॅन्स घेताना अधिक पैसे खर्च करावे लागणार आहेत. एअरटेल आणि वोडाफोन-आयडिया कंपन्यांनी सांगितले, की टेलिकॉम कंपन्यांनी आर्थिक उत्पन्न वाढवण्याची तयारी सुरु केली आहे. या कंपन्यांकडून 'फाईव्ह जी' नेटवर्कच्या विस्तारासाठी मोठी गुंतवणूक सुरू आहे. त्यामुळे या कंपन्यांनी थेट दरवाढ न करता स्वस्त प्लॅन्स सेवेतून हळहळू बंद करण्यास सुरूवात केली आहे. डिसेंबर २०२५ ते जून २०२६ दरम्यान मोबाईल रिचार्ज प्लॅनची किंमत वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. जिओ आपला आयपीओ येण्यापूर्वी १५ टक्के दरवाढ लागू करू शकते तर इतर कंपन्या दहा टक्के दरवाढ लागू करू शकतात. महागाईपासून वाचायचे असेल, तर नोव्हेंबर २०२५ मध्ये दीर्घकालीन व्हॅलिडीटीचा प्लॅन रिचार्ज केल्यास ग्राहकांना आजच्या दरात पुढील अनेक महिन्यांची सेवा मिळू शकते. दीर्घकालीन डेटाचा वापर करत असल्यास वार्षिक वैधतेचा प्लॅन रिचार्ज करणे फायद्याचे होऊ शकते. बीएसएनएल सध्या या दरवाढीपासून लांब आहे.

आता एक दखलपात्र बातमी. जुलै-सप्टेंबर तिमाहीमध्ये अनियमित उन्हाळा, मुसळधार पाऊस आणि जीएसटी बदलांमुळे ग्राहकोपयोगी उत्पादक कंपन्यांची कामगिरी संमिश्र राहिली. असे असूनही जगातील अनेक मोठ्या ग्राहकोपयोगी उत्पादक कंपन्या भारताबद्दल सकारात्मक आहेत. परदेशी कंपन्यांचा भारतीय बाजारपेठेवरील विश्वास कायम आहे. त्यामुळे येत्या काळात बाजारपेठेत तेजी येऊ शकते. सुमारे एक डझन कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले, की ते भारतात गुंतवणूक करत राहतील, कारण खपाची परिस्थिती स्थिर आहे आणि मागणी अपेक्षेपेक्षा वेगाने वाढत आहे. मोंडेलेझ, युनिलिव्हर, कार्ल्सबर्ग, कोलगेट-पामोलिव्ह, एलजी इलेक्ट्रॉनिक्स, ॲपल, पापा जॉन्स, डियाजियो, कोका-कोला, पेप्सिको आणि लेव्ही स्ट्रॉसच्या प्रमुखांनी सांगितले, की भारत त्यांच्यासाठी वेगाने वाढणारी बाजारपेठ आहे. 'मोंडेलेझ'चे 'सीईओ' डर्क व्हॅन डी पुट म्हणाले, की भारतात किरकोळ दबाव असले, तरी एकूण परिस्थिती चांगली आहे. जीएसटीशी संबंधित समस्या असूनही सप्टेंबरच्या तिमाहीमध्ये भारतात कंपनीची विक्री मध्यम प्रमाणात वाढली. 'युनिलिव्हर'चे 'सीईओ' फर्नांडो फर्नांडिस म्हणाले, की उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये कंपनीची स्थिती सुधारत आहे आणि मध्यम कालावधीत भारत चांगल्या स्थितीत आहे. त्यांनी सांगितले, की जीएसटी सुधारणांचा थोडासा परिणाम झाला आहे; परंतु त्यांच्या ४० टक्के उत्पादनांच्या किंमती सुमारे दहा टक्के कमी झाल्याने मागणी वाढण्याची अपेक्षा आहे.

हवामानातील बदल आणि मॉन्सूनच्या लवकर आगमनामुळे थंड पेये, एअर-कंडिशनर आणि रेफ्रिजरेटरसारख्या उन्हाळी उत्पादनांच्या विक्रीवर परिणाम झाला. जीएसटी संक्रमण प्रक्रियेचा ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये विक्रीवर परिणाम झाला. २२ सप्टेंबरपासून अनेक ग्राहक उत्पादनांवर जीएसटी कमी करण्यात आला. कोका-कोला, पेप्सिको आणि कार्ल्सबर्ग यांनी सुरुवातीला परिणाम नोंदवला होता; परंतु आता त्यांच्यात सुधारणा दिसून येत आहे. 'कार्ल्सबर्ग'च्या मुख्य वित्तीय अधिकारी उलरिका फर्न यांनी सांगितले, की गेल्या तिमाहीमध्ये भारतातील बिअर बाजारावर मुसळधार पावसाचा परिणाम झाला होता; परंतु सप्टेंबरमध्ये पुन्हा वाढ अनुभवायला मिळाली. बाजारातील वाटा वाढला असला, तरी सप्टेंबर तिमाहीमध्ये कंपनीच्या विक्रीत एक टक्का घट झाली. 'पेप्सिको'चे 'सीईओ' रॅमन एल. लागुआर्टा म्हणाले, की जागतिक स्तरावर ग्राहकांवर दबाव आहे; परंतु भारतातील परिस्थिती चांगली आहे. बदलते हवामान आणि स्पर्धेमुळे काही परिणाम होतील असे त्यांनी सांगितले; परंतु या श्रेणीत आणखी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, ग्रामीण बाजारपेठा शहरी बाजारपेठांपेक्षा चांगली कामगिरी करत आहेत. कंपन्या शहरी बाजारपेठांमध्ये प्रीमियम उत्पादनांवर लक्ष केंद्रित करत आहेत. 'कोलगेट-पामोलिव्ह'चे 'सीईओ' नोएल वॉलेस म्हणाले, की शहरांमध्ये मागणी कमी होत आहे, तर ग्रामीण भागातील परिस्थिती स्थिर आहे. त्यांनी पुढे सांगितले, की शहरी बाजारपेठेत आपला वाटा वाढवण्यासाठी कंपनी जास्त किमतीच्या उत्पादनांवर लक्ष केंद्रित करत आहे. इलेक्ट्रॉनिक्स कंपन्या कारखाने आणि दुकानांमध्ये गुंतवणूक करत आहेत. 'ॲपल'चे सीईओ टिम कुक म्हणाले, की सप्टेंबरच्या तिमाहीत कंपनीने भारतात आतापर्यंतचा सर्वाधिक महसूल नोंदवला आणि नवीन दुकाने उघडली.

# कचरा आला वेशीपाशी !

वैष्णवी वाडकर

अलिबाग तालुक्यात खड्डे आणि पाणीटंचाई यांसारखेच इतर अनेक प्रश्न कायम असतानाच कचरा व्यवस्थापनाची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहे. रस्त्यांच्या कडेला वाढणारे कचऱ्याचे ढिगारे दुर्गंधीसह रोगराईला आमंत्रण देत आहेत. अलिबाग तालुक्यात पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. मात्र, त्याचे योग्य व्यवस्थापन न झाल्याने स्थानिक नागरिकांमधून मोठी नाराजी व्यक्त होत आहे.

अलिबाग हे मुख्य प्रशासनिक ठिकाण असल्यामुळे हजारो नागरिक कामानिमित्त येथे येतात. त्याचबरोबर सुट्टीच्या दिवशी अलिबाग-मुरुड किनारपट्टीवर पर्यटकांची प्रचंड गर्दी उसळते. समुद्रकिनारे, किल्ले आणि पर्यटन स्थळांवर पर्यटक आनंद लुटण्यासाठे येतात. मात्र, फिरून झाल्यानंतर रिकामी चिप्स पाकिटे, प्लास्टिकच्या बाटल्या, कोल्ड्रिंक कॅन्स, पॉलिथिनच्या पिशव्या असे मोठ्या प्रमाणात कचरा त्याच ठिकाणी टाकतात. अनेक वेळा हा कचरा समुद्रात मिसळत असल्यामुळे समुद्री जीवसृष्टीवरही त्याचा परिणाम होत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. तसेच, मुरुड ते अलिबाग मार्गावरही रस्त्याच्या दोन्ही कडेला कचरा साचलेला आहे. काही ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे इतके वाढले आहेत की या कचऱ्याचा दुर्गंधीने प्रवाशांना बाहेरू नाक बंद करून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे कचरा व्यवस्थापनासाठी संबंधित प्रशासन पुरेशी यंत्रणा उभी करू शकत नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. अनेक भागांत दररोज कचरा उचलला जात नसल्याने भटक्या जनावरांकडून कचरा रस्त्यावर पसरवला जातो आणि परिस्थिती अधिकच गंभीर होते. काही वेळा भटकी जनावरे खाण्याच्या शोधात या ठिकाणी येऊन प्लास्टिक पिशवीसह त्यातील खाद्य खातात. त्यामुळे त्यांचे आरोग्यदेखील धोक्यात येत आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५' हा उपक्रम सुरु करण्यात आला. याबाबत जिल्हा प्रशासनाने ग्रामपंचायतींना स्वच्छता राखण्याच्या सूचना दिल्या. मात्र, अनेक गावांच्या वेशीवर कचऱ्याचे ढिगारे व घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसत असल्यामुळे हे अभियान अपयशी ठरल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी गाव पातळीवरील प्रशासनाला या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. शाळा, अंगणवाड्या, बाजारपेठा, धार्मिक स्थळे व सार्वजनिक शौचालयांची पाहणी करण्यात आली. सर्वेक्षणात शौचालयांचा वापर, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व प्लास्टिक संकलन याबाबत तपासणी झाली. मात्र, सुरुवातीला थोडी हालचाल दिसून आली तरी पुन्हा गावांच्या वेशीवर कचऱ्याचे ढिगारे आणि रस्त्यांवर घाण पाहायला मळिाली. प्रशासनाकडून स्वच्छता मोहीम राबवण्याच्या घोषणा करण्यात येतात. मात्र, प्रत्यक्षात त्या कितपत अंमलात आणल्या जातात, याबाबत सर्वसामान्यांमध्ये प्रश्नचिन्ह उपस्थित होत होत आहे. अलिबाग हे पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे, पण स्वच्छता नसल्याने अलिबागची प्रतिमा मलिन होत आहे, अशी चर्चा सध्या सुरु आहे. या आधी संबंधित प्रशासनाकडून घराघरांतून कचरा संकलनासाठी 'घंटागाडी' सेवा सुरू करण्यात आली होती. ही गाडी नियमितपणे प्रत्येक भागात जाऊन कचरा गोळा करायची आणि ठरवलेल्या कचकुंड्यांमध्ये टाकायची. या उपक्रमामुळे गावांच्या वेशीवर किंवा रस्त्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले होते. मात्र, ही सेवा काही काळच सुरू राहिली. सेवा बंद पडताच पुन्हा गावांच्या वेशीवर कचऱ्याचे ढिगारे दिसू लागले. अनेक ठिकाणी 'येथे कचरा टाकू नये, कचरा टाकलयास सक्त कारवाई केली जाईल' असे फलक लावलेले असतात. मात्र, त्याच ठिकाणी कचऱ्याचा मोठ्ठा ढिगारा साचलेला दिसतो. तसेच, कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी केवळ प्रशासनावर टाकून चालणार नाही, तर नागरिकांनीही स्वच्छतेबाबत जागरूक राहणे तितकेच आवश्यक आहे. घरोघरी ओला कचरा, सुका कचरा वेगळा ठेवणे, जेणेकरून पुनर्वापर आणि खतनिर्मितीसाठी कचऱ्यावर प्रक्रिया करणे सोपे होते. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत किंवा बायोगॅस बनवता येतो, तर सुका कचरा जसे की प्लास्टिक, कागद, धातू यांचा पुनर्वापर करता येतो. कचरा वेगळा ठेवल्यास पर्यावरण दूषित होण्याचा धोका कमी होतो आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होते. तसेच, रस्त्यावर किंवा कडेला पडलेला कचरा दिसल्यास तो उचलून कचरापेटीत टाकणे, स्वतःने खाल्ल्यानंतर कचरा रस्त्यावर फेकू नये, अशा छोट्या कृतींनीही शहर स्वच्छ ठेवता येते. 'स्वच्छ शहर' ही केवळ प्रशासनाची नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. याची जाणीव ठेवूनच स्वच्छतेकडे ठोस पाऊल उचलले जाऊ शकते.

लोकसंसद

## ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल काळाच्या पडद्याआड

हिंदी चित्रपटसृष्टीतील १९४०च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळातील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक असलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांना जाऊन जेमतेम महिना होत नाही तोपर्यंत आता त्याच काळातील आघाडीच्या अभिनेत्री असलेल्या कामिनी कौशल काळाच्या पडद्याआड गेल्या. त्यांचे खरे नाव उमा शिवराम कश्यप असे होते. २४ फेब्रुवारी १९२७ रोजी फाळणीपूर्वी लाहोर येथे जन्मलेल्या कामिनी कौशल यांनी १९४६ मध्ये 'नीचा नगर' या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. या सिनेमाने फ्रांसच्या पहिल्या कान्स चित्रपट महोत्सवात पाम डी'ओर हा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जिंकला होता. 'नीचा नगर'च्या यशानंतर त्यांनी जेल यात्रा (१९४७), दो भाई (१९४७), आग (१९४८), शहीद (१९४८), नदीया के पार (१९४८), जिद्दी (१९४८), शबनम (१९४९), पारस (१९४९), आरजू (१९४९) अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाची छाप पाडली. विशेष म्हणजे तो काळ हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनयश्रेष्ठ त्रिकुट दिलीप कुमार, देव आनंद आणि राज कपूर यांचा होता. या दिग्गजांबरोबर अनेक चित्रपटात कामिनी कौशल यांना काम करण्याची संधी मिळाली. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत अभिनयात रमणाऱ्या कामिनी कौशल यांना आदरांजली! **– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## शहरे खचत आहेत?

'नेचर सस्टेनेबिलिटी' या आंतरराष्ट्रीय विज्ञान नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार भारतातील प्रमूख महानगरे दिल्ली,मुंबई,चेन्नई, कोलकाता आणि बंगळुरू या शहरांतील समारे ८७८ चौ.कि.मी क्षेत्रफळाची जमीन सतत खचत आहे. २०१५ ते २०२३ दरम्यान यूरोपियन उपग्रह 'सेंटिनेल-१' कडून मिळालेल्या रडार आकडेवारीवरून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.या अभ्यासानूसार या शहरांतील अनेक भाग इतक्या वेगाने खचत आहेत की त्यामुळे इमारती, रस्ते आणि जलवाहिन्या यांना गंभीर धोका निर्माण झाला आहे किंवा होऊ शकतो. वैज्ञानिकांच्या मते जमीन खचण्यामागील प्रमुख कारण म्हणजे भूजलाचा अमर्याद उपसा. जमिनीखालून पाणी वेगाने काढले गेल्याने वरच्या मातीच्या थरांमध्ये कोरडेपणा निर्माण होतो आणि मातीचे थर हळूहळू आकुंचन पावतात. त्याचप्रमाणे वाढता शहरी ताण, अस्थिर जलव्यवस्थापन, अनियमित पावसाचे चक्र आणि कॉंक्रीटने झाकलेले विस्तीर्ण क्षेत्र या संकटाला अधिक गडद करीत आहे. **– दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

दिनविशेष

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज १७ नोव्हेंबर, आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांना पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची १३ वी पुण्यतिथी. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे काम ही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्राभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई – पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

– श्याम ठाणेदार, ठाणे

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
१७ नोव्हेंबर
१) श्री. प्रकाश पांडुरंग सप्रे
१७-११-१९४७
थळ, अलिबाग

# उरणमध्ये धनगरवाडा दाखल

## • कुटुंबाचे अर्थचक्र चालवण्यासाठी काही महिन्यांचा मुक्काम



| उरण | प्रतिनिधी |

पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर असणाऱ्या दुष्काळी भागातून मेंढपाळांचा मोठा समुदाय आपल्या हजारो मेंढ्या घेऊन चारा आणि पाण्याच्या शोधात उरण तालुक्याच्या पूर्व भागात दाखल झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हे मेंढपाळ कुटुंबाचे अर्थचक्र चालवण्यासाठी काही महिन्यांसाठी उरण परिसरात तळ ठोकणार असून, हिवाळ्यानंतर पुन्हा आपल्या मूळ गावी परत जातील. पुणे आणि जेजुरी परिसरातील दुष्काळग्रस्त भागातून दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला मोठ्या संख्येने मेंढपाळ रायगड जिल्ह्यात येतात.

यंदा पावसाने उशिरापर्यंत हजेरी लावली असली तरी, या मेंढपाळ बांधवांनी आपला पारंपरिक येण्याचा क्रम कायम ठेवला आहे. सध्या हे मेंढपाळ चिरनेर, कळंबूसरे, टाकीगाव, विंधणे, मोठीजुई, कोप्रोली, पिरकोन, सारडे, वशेणी यांसारख्या उरणच्या पूर्व भागातील गावांच्या परिसरात मुक्काम करत आहेत. शेतजमिनी आणि माळरानांवर मुबलक चारा व पाण्याची उपलब्धता असल्याने दरवर्षी हा भाग त्यांची तात्पुरती कर्मभूमी बनतो.

धनगरवाडा पुढील काही महिने उरणच्या पूर्व भागात आपले पारंपरिक जीवन जगत, निसर्गाच्या साहाय्याने कुटुंबाचा गाडा चालवणार आहे.

उरण परिसरात अद्यापही पावसाचा जोर असल्याने त्यांना सुरक्षित निवारा शोधावा लागत आहे. उदरनिर्वाहासाठी स्थलांतर मेंढपाळ कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी स्थलांतर हा एकमेव मार्ग आहे. त्यांची उपजीविका केवळ मेंढ्यांवर अवलंबून नसून, ते स्थानिक शेतकऱ्यांसाठीही महत्त्वाचे ठरतात. शेतकरी आपल्या शेतात मेंढ्या बसविण्यासाठी मेंढपाळांना काही धान्य आणि रोख रक्कम मिळत आहे.

मेंढ्यांनी शेतात मुक्काम केल्याने पिकासाठी नैसर्गिक खत (शेणखत) मिळते आणि जमीन कसदार होते. यामुळे शेतकरी व मेंढपाळ यांचे एक पारंपरिक आणि परस्परपूरक संबंध आजही या भागात टिकून आहे.

> घाटमाथ्यावर चारा-पाण्याची टंचाई आहे. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी इकडे यावं लागतं. या भागात आमच्या मेंढ्यांना भरपूर चारा आणि पाणी मिळतं, शिवाय शेतात मेंढ्या बसविल्याने शेतकऱ्यांकडून धान्य व पैसेही मिळतात.
> –मेंढपाळ

यंदा मात्र पाऊस उशिरापर्यंत झाल्यामुळे, ज्या शेतात पिके कापून झाली आहेत, तिथेही काही भागात पाणी साचलेले असल्याने मेंढ्यांना बसविण्यासाठी तसेच मेढपालांचे संसार मांडण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे.

## खारघरमध्ये समविषम पार्किंग

**खारघर :** खारघर सेक्टर ४ मध्ये वाहतूक कोंडी उद्भवत असल्याने समविषम पार्किंग लागू करण्यात आली आहे. खारघर सेक्टर चार मध्ये मोठ्या प्रमाणात दुकाने वाढली आहेत. पूर्व प्राथमिक वर्ग तसेच माध्यमिक शाळा आहे. दुकानदार तसेच परिसरात वास्तव्य करणारे नागरिक हे रस्त्यावर वाहने उभी करीत असल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असल्यामुळे खारघर स्वच्छ फाऊंडेशनच्यावतीने खारघर वाहतूक पत्र व्यवहार करून सम विषम पार्किंग योजनेची मागणी केली होती. वाहतूक विभागाकडून केलेल्या पाहणीत परिसरात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सम विषम पार्किंगची योजना सुरु केली आहे.



## भातकापणीसाठी लोखंडी विळ्यांना पसंती

| उरण | प्रतिनिधी |

ग्रामीण भागात अजूनही शेतकरी पारंपरिक विळ्यांच्या साह्याने भातकापणी करतात. त्यामुळे अवजारांची जुळवाजुळव करून बळीराजा मिळेल त्या मनुष्यबळाच्या आधारे शेतातील धान गोळा करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यासाठी विळे-कोयते कारागिरांकडून धार लावन घेणे व विळ्यांना मुठी बसविण्याचे काम सुरू आहे.

दिवाळीनंतर विळे-कोयते कारागीर गावोगावी जाऊन शेतकऱ्यांसाठी लागणाऱ्या शेतीसाठी उपयोगी विळे कोयते यांसारख्या शेती अवजारांना धार लावून देण्याची कामे दरवर्षी करतात. यात नवीन, जुने विळेही दुरुस्त करून त्याला धार लावून दिली जाते.

# बालकामगारांचे पुनर्वसन कागदावरच

| ठाणे | प्रतिनिधी |

राज्यशासनाच्या कामगार, महिला व बालविकास विभाग, पोलीस आणि सामाजिक संस्थांच्या वतीने टाकण्यात येणाऱ्या व्यवसाय व उद्योगात टाकणाऱ्या धाडी आणि त्यातून बालकामगारांची होणारी सुटका यांची संख्या दिवसेंदिवस घटते आहे. कामगार विभागाने गेल्या अडीच वर्षात केवळ ७०१ धाडी टाकून त्यातून सुमारे ३९१ बालकामगारांची सुटका केली आहे. सुटका करण्यात आलेले बालकामगार शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातंर्गत कार्यरत असलेल्या औपचारिक शिक्षणाच्या शाळा बंद झाल्याने अनेक मुले पुन्हा



बालमजुरीच्या प्रथेत ओढले जातात, हे वास्तव आहे. राज्यातील धोकादायक उद्योग, जरीकाम, हॉटेल, कपडा उद्योग आणि इतर अनेक व्यवसाय व उद्योगांमध्ये आजही हजारो बालकामगार कार्यरत आहेत, मात्र मनुष्यबळाची कमतरता आणि राज्यशासन बालकामगारांच्या प्रश्नाप्रती म्हणावे तितके संवेदनशील नसल्याचे शासकीय आकडेवारी सांगते आहे.

बालकामगाराची मुक्तता केल्यानंतर त्यांना पालक असले तर मुले त्यांच्या स्वाधीन केले तरी ते केंद्र सरकारच्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शाळांमध्ये सामावून घेतले जात; परंतु या शाळा बंद करून या मुलांना समग्र शिक्षा अभिनयात सामावून घेतले जाते. त्या मुलाच्या निवाऱ्याची सोय नसल्यास त्याला एखाद्या संस्थेत दाखल करून घेतले जाते, पण जी मुले पालकांच्या स्वाधीन केली जातात, ती मुले कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी बालमजूरीकडे वळतात, कारण बालमजूरी रोखण्यासाठी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्त्याखाली असेलेल्या कृती दलाच्या बैठका नियमित होत नाहीत. त्यामुळे प्रथेतून मुक्त केलेली मुलांचे पुढे काय होते, हे यंत्रणा कागदोपत्री दाखवत असली शासकीय यंत्रणेकडे पुरेसे मनुष्यबळ आणि या विषयी आस्था नसल्याने या मुलांचा पुनर्वसन प्रक्रियेचा पाठपुरावा करण्यात यंत्रणा अपयशी ठरतात. महिला व बालविकास विभागाच्या मार्फत रस्त्यावर फिरणाऱ्या बालस्नेही फिरत्या पथकांच्या शाळांमार्फत औपचारिक शिक्षणाची सोय केली जात असली तरी राज्यातील सर्व शहरे आणि महानगरांमध्ये ही सुविधा कार्यरत नाही, त्यामुळे सुटका झालेल्या कोवळ्या हातांना व्यवस्थेत वालीच नाही.

# उठाबशांच्या शिक्षेमुळे विद्यार्थिनीचा मृत्यू

| नालासोपारा | प्रतिनिधी |

बाल दिनाचा उत्साह संपत नाही तोवर एका बालिकेचा मनाला चटका लावणारा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वसई पूर्वतील सातिवली येथील श्री हनुमंत विद्यामंदिर शाळेत १० मिनिटे उशिरा आल्याने शिक्षिकेने दिलेल्या १०० उठाबशांच्या शिक्षेमुळे तब्येत बिघडून एका १३ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याने समाजमन सुन्न झाले आहे. काजल गौड असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून, ती इयत्ता ६ वीच्या वर्गात शिकत होती. ८ नोव्हेंबर रोजी अनेक विद्यार्थी शाळेत उशिरा पोहोचले होते. त्यात काजलचाही समावेश होता. शिक्षकांनी थेट






आले. प्रकृती गंभीर झाल्याने तिला मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

मात्र, उपचार सुरू असतानाच बाल दिनाच्या दिवशीच शुक्रवारी रात्री ११ वाजता काजलचा मृत्यू झाला. काजलच्या कुटुंबीयांनी शाळा व्यवस्थापन व शिक्षकांवर मृत्यू झाल्याची माहिती मिळताच पोलीस तिथे दाखल झाले, संबंधित माहिती गोळा करून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, ही घटना पालकांमध्ये चिंता निर्माण करणारी ठरली आहे. शाळेत शिस्त राखण्यासाठी दिल्या जाणार्या शिक्षेचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर किती गंभीर परिणाम होऊ शकतो, हे या घटनेमुळे अधोरेखित होत आहे. या प्रकरणावर स्थानिक नागरिकांकडून शिक्षकांवर कठोर कारवाईची मागणी होत असून, वसई-विरारमध्ये संतापाची लाट पसरली आहे. शाळेला अधिकृत मान्यता नाही; मनसेने टाळे ठोकलेया प्रकरणाबाबत मनसेने तीव्र भूमिका घेतली आहे. मनसेच्या कार्यकर्त्यांनी शाळेत धडक देत प्रशासनाला जाब विचारला आणि शाळेच्या प्रवेशद्वाराला टाळे ठोकले. शिक्षिकेवर गुन्हा दाखल होईपर्यंत शाळा उघडू दिली जाणार नाही, असा इशारा मनसेकडून देण्यात आला आहे.

## हळदीच्या भाजीला वाढली मागणी

| ठाणे | प्रतिनिधी |



थंडीची चाहूल लागताच बाजारपेठेत हंगामी भाज्यांची लगबग वाढत आहे. त्यात राजस्थानातील प्रसिद्ध हळदीची भाजी आता सर्वत्र आवडीने घेतली जाऊ लागली आहे. शहरी भागातही ओली हळद, भाजीला चांगली मागणी वाढली आहे. शरीराला उष्णता देणारी आणि आरोग्यदायी गुणधर्मांनी भरलेली ही भाजी राजस्थानात हिवाळ्यात तसेच लग्नसमारंभांसारख्या प्रसंगी पारंपारिकरीत्या केली जाते.

महाराष्ट्रातही या भाजीकडे अलीकडेच मोठ्या प्रमाणावर लक्ष वेधले जात असून घराघरात तिचा समावेश वाढतो आहे. सध्या ही भाजी सुमारे २०० रुपये किलो या दराने उपलब्ध आहे. डोंबिवलीतील भाजी विक्रेत्या आशा घोलाप यांनी सांगितले की, सध्या डोंबिवलीत ही भाजी २०० रुपये प्रति किलो दराने विकली जात आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्रीय किंवा इतर ठिकाणचे सर्वच भागातील लोक ही भाजी घेण्यासाठी गर्दी करत आहेत. गेल्या दोन आठवड्यांपासून बाजारात आलेल्या या भाजीची किंमत येणाऱ्या काळात आणखी वाढण्याची शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे. हळदीच्या कंदात दाह कमी करणारे, रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे घटक असल्याने हिवाळ्यात तिच्या सेवनाला विशेष महत्त्व असते. त्यामुळे चव आणि आरोग्य यांचा समतोल साधणारी ही भाजी डोंबिवलीत लोकप्रिय होत असून, बाजारातील वाढती गर्दी पाहता यंदा हळदीची भाजी हिवाळ्याची खास चव ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे. आरोग्यासाठी गुणकारीहळदीचे औषधी गुणधर्म सर्वश्रुत आहेत. हळदीमध्ये असलेले करक्युमिन हे घटक आरोग्यदायी मानले जाते. त्यामुळेच, थंडीमध्ये या भाजीचे सेवन केल्याने अनेक आरोग्यविषयक फायदे मिळतात आणि यामुळेच डोंबिवलीकर नागरिक देखील या भाजीला आपल्या आहारात समाविष्ट करत आहेत.

# खारघरमधील भूखंडाला सर्वाधिक बोली

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नवी मुंबईतील भूखंडांचे भाव दिवसेंदिवस गगनाला भिडत असून 'सिडको'च्या लिलावांमध्ये विक्रमी दर नोंदवले जात आहेत. सानपाडा, नेरूळ, घणसोली, ऐरोली, बेलापूर, खारघर, पनवेल, कामोठे आणि उलवे परिसरात विकासकामे वेगाने होत असल्याने बांधकाम व्यावसायिकांचा कल या भागांकडे वाढला आहे. त्यातच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे क्षेत्राचे महत्त्व अधिकच वाढले असून खारघर हे रिअल इस्टेटचे नवे हॉट डेस्टिनेशन ठरत आहे.

अलीकडेच झालेल्या सिडकोच्या लिलावात खारघर सेक्टर-२३ मधील सेंट्रल पार्क परिसरातील प्लॉट क्र. ८ (क्षेत्रफळ ४१,९९४ चौ.मी.) या प्रीमियम भूखंडाला तब्बल ५,०६,००१ रुपये प्रति चौ.मी. इतकी विक्रमी बोली मिळाली आहे. यामुळे या भूखंडाची एकूण किंमत जवळपास २१२५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे खारघर हे नवी मुंबईतील सर्वाधिक मागणी असलेले प्रॉपर्टी डेस्टिनेशन म्हणून पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. सिडकोच्या मार्केटिंग विभागाने खारघर सेक्टर-२३ मधील प्लॉट क्र. ८ विक्रीसाठी ऑनलाइन लिलाव प्रक्रिया राबवली होती.

**शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहलींचा ओघ | कोकणातील निसर्गरम्य वातावरण आकर्षक**

# निसर्गरम्य पर्यटन स्थळांना वाढता प्रतिसाद

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गणपतीपुळे येथे आता बोचर्या थंडीच्या पर्यटन हंगामाला दणक्यात सुरुवात झाली आहे. या हंगामात येथील निसर्गरम्य पर्यटन स्थळाला विविध ठिकाणच्या पर्यटकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. तसेच या हंगामात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहलींची अधिक पसंती गणपतीपुळ्याला मिळते, अशी माहिती स्थानिक व्यावसायिक व ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे. थंडीचा पर्यटन हंगाम म्हटला की, कोकणातील निसर्गरम्य वातावरण सर्वच पर्यटकांना खुलावणारे असते. या हंगामात पहाटेच्या सुमारास पडणारा थंडीचा सुखद गारठा आणि



डोंगरदर्यातून व रस्त्यांवरून दिसणारे दाट धुके असे निसर्गरम्य वातावरण पर्यटकांना पाहण्यासारखे असते. कोकणात विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील निसर्गरम्य पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांची पावले वळू लागली आहेत. त्यातील निसर्गरम्य गणपतीपुळे हे जागतिक दर्जाचे पर्यटन असल्याने या ठिकाणी पावसाळी आणि उन्हाळी पर्यटनाबरोबरच हिवाळी पर्यटनाला देखील तितकाच प्रतिसाद पर्यटकांकडून मिळतो. या हंगामात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहलींचा ओघ सुरू झाला आहे.

दरवर्षी या ठिकाणी सहलींची सर्वाधिक संख्या असल्याची माहिती देखील प्राप्त होते. त्यामुळे यंदादेखील तितकाच प्रतिसाद मिळेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. एकूणच थंडीच्या पर्यटन हंगामामध्ये येथील पर्यटनाला वाढती चालना मिळू लागली आहे. त्यामध्ये हॉटेल लॉजिंग व्यवसायिकांबरोबरच सर्वच लहान मोठ्या व्यवसायिकांच्या व्यवसायाला आर्थिक उलाढालीची व पर्यटनाची चालना मिळू लागली आहे. एकूणच या हंगामात पर्यटकांचा राबता सुरू झाला असून येथील येथील स्वयंभू श्रींच्या दर्शना बरोबरच पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक थंडीच्या हंगामामध्ये गणपतीपुळे पर्यटन स्थळाकडे पुन्हा आकर्षित होऊ लागले आहेत.

पॅराग्लायडिंग राईड ठरतेय खास आकर्षणगणपतीपुळेनजीकच्या मालगुंड येथील निसर्गरम्य पर्यटन स्थळाच्या समुद्र चौपाटीवर वॉटर स्पोर्ट व अन्य व्यवसायांबरोबरच पॅराग्लायडिंग ही वेगळी पर्यटन सफर पर्यटकांना घडवून आणली जाते. त्यामुळे या राईडचा आनंद घेण्यासाठी गणपतीपुळेमध्ये येणार्या पर्यटकांची पावले मालगुंडकडे वळत असतात. उंच आकाशात घेऊन जाणारी ही सफर अनेक पर्यटकांना एक वेगळा आनंद देऊन जाते. येणाऱ्या सर्वच पर्यटक आणि विशेषत: सहलीतील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खास आकर्षण ठरत आहे.

### थर्टीफर्स्टला सर्वाधिक गर्दी

**थंडीचा हंगाम सुरू झाल्यानंतर डिसेंबर महिन्याच्या एंडिंगमध्ये नाताळ व सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्याच्या निमित्ताने अनेक पर्यटक दाखल होत असतात. या निमित्ताने येथील विविध पर्यटनात्मक बाबींचा घेण्यासाठी घेण्यासाठी आणि विशेषत: सरत्या वर्षातील वर्षातील मनमुराद आनंद लुटण्यासाठी पर्यटन मोठ्या संख्येने गणपतीपुळे ला पसंती दर्शवितात.**

## निवडक

### करंजाडेची टँकरमुक्ती दृष्टिपथात

**पनवेल :** करंजाडे वसाहतीतील सेक्टर ६ येथील सुमारे १५० सोसायट्यांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. याबाबतचे वृत्त सकाळमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर सिडको पाणीपुरवठा विभागाकडून जलवाहिनीच्या तांत्रिक तपासणीचे काम सुरू केले आहे. सिडकोकडून करंजाडे वसाहतीला १८ ते २० एमएलडी पाणीपुरवठा होत असल्याने सिडकोकडून करंजाडे वसाहतीला पाणीपुरवठा होत आहे, मात्र येथील सेक्टर ६ येथे कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने येथील १५० सोसायट्यांना फटका बसत आहे. परिणामी, रहिवाशांना पाणी समस्याला सामोरे जावे लागत आहे. सडकोचे सहाय्यक अभियंता पाणीपुरवठा विभाग डॉ. वीरेंद्र पाटील यांनी सेक्टर ६ येथे जुनी जलवाहिनी बदलण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी तांत्रिक तपासणी सुरू केली असून, लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार असल्याने करंजाडे टँकरमुक्त होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### रब्बीच्या पेरण्या संथ गतीने

**रत्नागिरी :** नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा सरला तरी कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात रब्बी हंगामाच्या पेरण्यांनी अद्याप म्हणावा तसा वेग पकडलेला नाही. जिल्ह्यात एकूण सरासरी सहा हजार हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामच्या पेरण्याचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत रब्बीचा एकूण पेरा ४.७६ टक्क्यांवर पोहोचला आहे. केवळ २४३ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झालेल्या आहेत. ऊसपिकासह २५९.३५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. कुळीथ, संकरित, पावटा, मका, कडधान्य यासह विविध पिकांची पेरणी झाली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सलग सहा महिने पाऊस झाल्यामुळे खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. भात शेती हातातून गेली. यंदा भात पिकाचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस झाल्याने यंदा रब्बी हंगाम लांबला आहे. खरीपाचे कामे अद्याप पूर्ण झाली नाही. ज्यांचे झाले आहे अशा शेतकर्यांनी शेतातील नांगरणी केलेली असून कडधान्यासह पालेभाज्यांची पेरणी पूर्ण झालेली आहे.



### किरकोळ बाजारात भाजीपाला महाग

**नवी मुंबई :** परतीचा पाऊस आणि बदलत्या हवामानाचा फटका राज्यातील शेतमालाला बसला असून परिणामी गेल्या आठवड्यापासून शेतमालाची आवक ३० ते ४० टक्क्यांनी घटली. यातून किरकोळ बाजारात भाजीपाला सरासरी ६० ते १०० रुपये किलोपर्यंत पोहचला आहे. कोथिंबीर जुडी २० रुपयांवरून ५० रुपयांवर गेली आहे. १५ डिसेंबरपर्यंत म्हणजेच महिनाभर भाजी बाजारात हीच स्थिती राहील, अशी माहिती घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब बडदे यांनी दिली. परतीच्या पावसाने, लागवड केलेल्या शेतमालाचे प्रचंड नुकसान केले. एरव्ही हिवाळा सुरू झाला की भाज्या स्वस्त मिळतात, परंतु गेल्या आठवड्यात सामान्य भाज्यांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांत एपीएमसी मार्केटमध्ये भाजीपाल्याची आवक ३० टक्के कमी झाली. डिसेंबरच्या मध्यापर्यंत, दर हिवाळ्याप्रमाणे किमती कमी होतील. तथापि, १५ डिसेंबरपर्यंत पुरवठा कमी राहील. किरकोळ बाजारात पालक, मेथी आणि कोथिंबीर जुडी घाऊक बाजारात १८ ते २० रुपये असून किरकोळ बाजारात हीच कोथिंबीर ५० रुपये जुडी तर इतर पालेभाज्या ३० रुपये जुडी विक्री केली जाते. एक किलो टोमॅटो देखील ५० रुपयांना मिळतो, जो एका आठवड्यापूर्वी २० रुपयांना होता. गवार ६० रुपयांवरून १२० रुपयांपर्यंत वाढली आहे, भोपळा ४० रुपये, कोबी १०० रुपये, वांगी ९० ते १०० रुपयांपर्यंत बाजारात वाढ झाली आहे.

### राज्यात साथीच्या आजारांचा उद्रेक

**मुंबई :** राज्यात अनियमित पाऊस, साचलेले पाणी आणि बदलते हवामान या कारणांमुळे डासांची उत्पत्ती वाढली असून, मलेरिया, डेंग्यूचा, चिकनगुनियाचा प्रादुर्भाव वाढत आहे. राज्यात मुंबई मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियाची हॉटस्पॉट ठरली आहे. यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली होती. हा पाऊस नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरूच होता. या कालावधीत हवामानात सातत्याने



बदल होत असल्याने साथीच्या आजारांनी डोके वर काढले. राज्यात मान्सून परतला असला तरी सध्या साथीच्या आजारांचा प्रकोप सुरूच आहे. आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत डेंग्यू, मलेरिया, स्वाईन फ्लू, लेप्टोस्पायरोसिस, चिकनगुनिया आणि जलजन्य आजारांचे ३९,७१८ रुग्ण नोंदले गेले असून ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. मलेरिया व डेंग्यू या डासजन्य रोगांनी ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, ७ नोव्हेंबरपर्यंत राज्यात मलेरियाचे २०,१६६ रुग्ण आणि १५ मृत्यू, तर डेंग्यूचे १२,३५१ रुग्ण नोंदवले गेले आहेत. याशिवाय, जलजन्य आजारांमध्ये कॉलरा (१९१), पिवळा ताप (६८७), गॅस्ट्रोएन्टरायटिस (४३), अतिसार (१,२३४) आणि टायफॉईड (२२) रुग्ण आढळले आहेत. बर्ड फ्लूचीही ७३ प्रकरणे नोंदली गेली आहेत.



### अंगणवाडीमध्ये बालदिन साजरा

**पोलादपूर :** एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत पोलादपूर नगरपंचायत बाजारपेठ हद्दीतील अंगणवाडीमध्ये (दि.१४) नोव्हेंबर २०२५ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी करण्यात आली. अंगणवाडी सेविका आरती मनिष पाटणे आणि अंगणवाडी मदतनीस रूपाली सुनील गायकवाड यांनी अंगणवाडीतील बालक-बालिकांना गीत व कविता वाचन, नृत्य सादरीकरण, बालगीत, छान छान गोष्टी, चित्र रंगविणे अशा विविध उपक्रमांनंतर खाऊ वाटप करीत आनंद साजरा केला. यावेळी पंडीत नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पालकांच्या सहकार्याने बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# निवडक




## चोरीला गेलेले आठ मोबाईल ताब्यात

**नेरळ :** येथे मोठ्या प्रमाणात मोबाईल चोरीच्या घटना घडल्या होत्या. त्या गुन्ह्यांचा तपास करताना नेरळ पोलिसांनी विविध ठिकाणांहून अनेक मोबाईल जप्त करून चोरीचे गुन्हे उघड झाले आहेत. यावेळी तब्बल आठ मोबाईल ताब्यात घेण्यात आले आहेत. त्यामध्ये विवो, सॅमसंग, अँपल, एमआय या कंपनीचे मोबाईल चोरी गेले होते. या बाबतच्या तक्रारी नेरळ पोलीस ठाण्यात करण्यात आल्या होत्या. त्यानंतर नेरळ पोलीस ठाण्यातर्फे मोबाईल मिशन रबावण्यात आले. हे मिशन नेरळ पोलीस स्टेशन आणि अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक विजय शिवतरे, पोलीस उप अधीक्षक राहुल गायकवाड, नेरळचे प्रभारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली व गुन्हे अन्वेषण विभागाचे विनोद वांगणीकर, राजेभाऊ केकाण, आशु बेंद्रे, सचिन वागमारे यांचा मध्यमातून रबावण्यात आले. यावेळी राजस्थान, पुणे, मुबंई या ठिकाणावरून हे मोबाईल जप्त करण्यात आले.



## शेतकऱ्यांची आकाशाकडे पाहत मळणी

**रसायनी :** रायगड हे भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते. परंतु, पावसाळी हंगाम संपला तरी पाऊ पडतच होता. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला होता. दरम्यान, पावसाने पुन्हा थैमान घालू नये म्हणून शेतकरी पावसाशी टक्कर देऊन हातातोंडाशी आलेल्या पीकाची कापणी करत आहेत. तसेच, भिजलेले भात पिक घेऊन झोडणी करत आहेत. दिवाळी नंतर शेतकरी आकाशाकडे बघून कापणी करीत होता. कारण पाऊस साठवलेली भात शेतीची मळणी देखील करून देत नव्हता. आता आकाशाकडे पाहत पावसाचा अंदाज घेऊन शेतकरी झोडणी करत आहे. तसेच, एका बाजूला झोडणी तर दुसऱ्या बाजूला मळणी करून काढलेले भिजलेले भात सुकवण्याचे प्रयत्न करताना दिसत आहे. यावेळी देखील तो आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.



## बिरसा मुंडांच्या जयंतीनिमित्त उपक्रम

**सुतारवाडी :** क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आदिवासी मोर्चा अध्यक्ष शशिकांत जगताप यांनी आंबिवली, पहूर, पाथर शेत तसेच अन्य आदिवासी वाड्यांमध्ये ज्येष्ठ महिलांना जिवनावश्यक वस्तुंचे वाटप केले. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तू व पाथरशेत आदिवासी वाडीतील बांधवांना जातीच्या दाखल्यांचे वाटप करून बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शशिकांत जगताप यांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याची माहिती सांगितली. यावेळी महेश ठाकूर, सुप्रिया वाघमारे, मंजुळा पवार, अलका पवार, विनायक जाधव, संजय वाघमारे, वासंती जगताप, अतुल पवार, गुलाब गोसावी, संतोष कोळी, रूपाली पवार, अनिल खंडागळे, अंगणवाडी सेविका, तसेच अंबिवलीचे मुख्याध्यापक प्रशांत वाघ चौरे, वाघचौरे आदी उपस्थित होते.

## रमेश भोळे यांना पुरस्कार जाहीर



**रसायनी :** पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रात गेली अनेक दशके भरीव योगदान देणारे ज्येष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना प्रतिष्ठेचा 'इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड' जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील सन्मानामुळे रायगड जिल्ह्यातील पत्रकारितेच्या वतुळांत आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे. 'साईचे सोबती' या पुस्तकाचे ते लेखक आहेत. त्यांच्या लेखणीतून साकारलेल्या अनेक कथा आणि लेख दरवर्षी दिवाळी अंकांमधून तसेच 'साईलीला' या विशेष अंकांमधून मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या साहित्यातून समाजप्रबोधन आणि माहितीचा प्रसार सातत्याने होत असतो. तसेच, त्यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित पत्रकारिता क्षेत्रातील कार्याची दखल घेत, त्यांना आता 'इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड' जाहीर करण्यात आला आहे. हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा येत्या पत्रकार दिनी, म्हणजेच ६ जानेवारी रोजी शिर्डी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

# शेतकऱ्यांच्या पीक कापणी प्रयोगाची फसवणूक

| उरण | प्रतिनिधी |

शेतकऱ्यांसाठी पीक कापणी प्रयोगराबविण्यात आला आहे. यापीक कापणी प्रयोगात उरण तालुक्यातील गावागावातील शेतकऱ्यांच्या पीक कापणीच्या प्लॉटची तालुक्यातून ड्रॉ पद्धतीने आणेवारीसाठी निवड करण्यात आली. दरम्यान, चिरनेर येथील दोन शेतकऱ्यांची पीक कापणी प्रयोगासाठी ड्रॉ पद्धतीने आणेवारीसाठी निवड झाली होती. त्यानुसार उरण महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यांनी या शेतकऱ्यांच्या पीक कापणी प्रयोगाच्या प्लॉटला भेट देखील दिली. मात्र, त्यातील एका शेतातील पीक कापणी अपूर्ण ठेवल्यामुळे भटक्या जनावरांनी उर्वरीत पिकाची नासधुस केली आहे. तसेच, दुसऱ्या शेतकऱ्याच्या घरातील भाताचे वजन करून कोप्रोली मंडळ महसूल अधिकाऱ्यांकडून खोटा अहवाल तयार करण्यात आला, अशी माहिती कृषीमित्र तथा महाराष्ट्र शासनाच्या शेतीनिष्ठ पुरस्काराचे मानकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली आहे.

चिरनेर येथील गौरव ठाकूर व धनाजी नारंगीकर या शेतकऱ्यांच्या पीक कापणी प्लॉटची ड्रॉ पद्धतीने आणेवारीसाठी निवड करण्यात आली. त्यानुसार उरण महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यांनी नुकतीच या शेतकऱ्यांच्या पीक कापणी प्रयोगाच्या प्लॉटला भेट दिली. त्यात गौरव ठाकूर यांच्या पीक कापणीच्या प्लॉटची अपूर्ण कापणी करून बाकीचा प्लॉट तसाच टाकून दिला. त्यानंतर राहिलेला प्लॉट कापण्यासाठी महसूल खात्याचे कर्मचारी न आल्यामुळे रानातील उनाड गुरांनी या प्लॉटच्या भात पिकाची पूर्णपणे नासाडी केली. तर, धनाजी नारंगीकर या शेतकऱ्याचा पीक कापणीचा प्लॉट न कापताच, शेत घरामध्ये असलेल्या पिशवीतील भाताचे वजन करून, कोप्रोली मंडळ महसूल अधिकाऱ्यांकडून खोटा अहवाल तयार करण्यात आला, अशी माहिती प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली.

त्यामुळे महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या गलथान व बेजबाबदार कारभाराबद्दल संताप व्यक्त केला जात आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या प्लॉटचे उनाड गुरांकडून झालेल्या नुकसानीबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. महसूल खात्याचे कर्मचारी खोटा अहवाल तयार करून, शासनाची व शेतकऱ्यांची फसवणूक करत असतील तर शेतकऱ्यांचे भवितव्य अंधारातच राहील, अशा शब्दात येथील शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.




### पीक कापणी प्रयोगाची प्रक्रिया

पीक कापणी प्रयोगाबाबत माहिती घेतली असता, सर्वप्रथम गावातील किंवा क्षेत्रातील काही यादृच्छिक (रँडम) पद्धतीने निवडले जातात. या निवडीमध्ये विशेष मोबाईल अ‍ॅप किंवा दूर संवेदन तंत्रज्ञाचा वापर केला जातो. निवड केलेल्या शेतात ठराविक क्षेत्र उदा. ५ मीटर बाय ५ मीटर मोजून हे क्षेत्र गुप्तपणे ठेवले जाते. त्यानंतर ज्यावेळी पर्यवेक्षक प्रत्यक्ष येतो तेव्हाच अंतिम निवड होते. या शेतातल्या नमूद क्षेत्रातील सर्व पीक कापून अंतिम उत्पन्नाची मोजणी किलो, हेक्टर अशी केली जाते. कापणी झालेल्या पिकाची मळणी करून धान्याचे अंतिम वजन घेण्यात येते. ही सर्व माहिती, फोटो, वजन आदी मोबाईल अ‍ॅप किंवा पिक विमा पोर्टलवर तात्काळ अपलोड केली जाते.

### शेतकऱ्यांचे भवितव्य धोक्यात

प्रत्येक हंगामातील पीक कापण्याच्या योग्य वेळेला व कापणी सुरू होण्याच्या पंधरा ते वीस दिवसांत पीक प्रयोग शेतात प्रत्यक्ष पिकाची कापणी सुरू करण्यात येते. असे नियम असताना, अशा प्रकारे रँडम प्लॉटचे कोप्रोली मंडळ खरीप पिक आणेवारी घेत असेल तर शेतकऱ्यांचे भवितव्य धोक्यात असल्याची प्रतिक्रिया येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. बदलत्या निसर्गचक्राच्या फेऱ्यात अडकलेला शेतकरी महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या बेजबाबदारपणात अडकत असेल तर शेतकऱ्यांचा भवितव्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही, अशा प्रतिक्रिया तालुक्यातील शेतकऱ्यांमधून उमटत आहेत.

# कर्जत येथे आगरी ग्रंथालयाची स्थापना

| नेरळ | प्रतिनिधी |

'आगरी ग्रंथालय चळवळ' ही सामाजिक-साहित्यिक चळवळ आगरी बोलीभाषा, आगरी संस्कृती आणि साहित्य यांचा वारसा जपण्याच्या तसेच तिचा प्रसार वाढवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाद्वारे प्रत्येक तालुक्यात एक आगरी ग्रंथालय उभारून वाचन आणि लेखन संस्कृतीला चालना देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या चळवळीमागे युवा साहित्यिक सर्वेश तरे, गीतकार-संगीतकार दया नाईक, आगरी संस्कृती अभ्यासक व चित्रकार मोरेश्वर पाटील, तसेच साहित्यिक प्रकाश पाटील या चार जणांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या संयुक्त प्रयत्नातून आगरी समाजासाठी साहित्यिक चळवळीचा नवा अध्याय सुरू झाला आहे. या चळवळीचा पहिला टप्पा म्हणून २०२० मध्ये डोंबिवली (निलजे) येथे सर्वोदय महाविद्यालयाचे प्राध्यापक महेंद्र पाटील यांच्या प्रयत्नातून पहिले आगरी ग्रंथालय सुरू झाले. त्यानंतर ठाणे जिल्ह्यातील कळवा येथे 'आगरी सेना'चे संपर्कप्रमुख मनोज साळवी यांच्या पुढाकारातून दुसरे ग्रंथालय सुरू करण्यात आले. आता कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या पुढाकाराने आगरी ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून तिसरे आगरी ग्रंथालय कर्जत येथे सुरू होणार आहे. नेरळ येथील आगरी समाज सभागृहात रविवारी (दि.२३) या तिसऱ्या आगरी ग्रंथालयाचा शुभारंभ होणार असून, या कार्यक्रमात आगरी समाजातील साहित्यिक, कलाकार, अभ्यासक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या ग्रंथालयांद्वारे आगरी भाषेतील वायय, संशोधन आणि समाजजीवनाशी निगडित साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आगरी ग्रंथालय चळवळ सर्व आगरी साहित्यिकांना आवाहन करत आहे की, आपल्या प्रकाशित साहित्यकृतींच्या किमान तीन प्रती ग्रंथालयासाठी पाठवाव्यात, जेणेकरून हे साहित्य आगरी बोलीच्या जतन आणि प्रसारासाठी उपयुक्त ठरेल.

# तहसीलदार घारे यांची प्रांतपदी नियुक्ती

| म्हसळा | प्रतिनिधी |



म्हसळा तालुक्यात तीन वर्षे पारदर्शक सेवा करणारे तहसीलदार समीर घारे यांची सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे उपविभागीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. घारे यांनी म्हसळा तालुक्यात अनेक शासकीय योजना प्रभावी पणे राबविल्यात. पूर परिस्थितीत तालुक्यातील प्रत्येक खेड्यात भेटी देऊन पूरपरिस्थितीचा आढावा घेऊन जास्तीत जास्त नुकसानभरपाई मळिवून देण्यासाठी प्रयत्न केला. तालुक्यातील सर्वसामान्य लाभर्थ्यांना न्याय मळिवून देण्यासाठी ते सदैव तत्पर राहिले. काही वेळा तर एच.एस.एम. लॉगिंगमध्ये बिघाड झाल्याने त्यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ऑफलाईन दाखले देण्याची व्यवस्था केली. त्यांनी दीड वर्षे मुंबई येथे निवडणूक तहसीलदार म्हणूनही उल्लेखनीय काम केले असून या सर्व बाबींचा विचार करुन समीर घारे यांना सावंतवाडी येथे उपविभागीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचेअभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# ई-सिगारेट प्रकरणी गुन्हा

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, नवीन पनवेल, खांदा कॉलनी व तळोजा इत्यादी परिसरात ई-सिगारेट खुलेआमपणे विकले आत आहेत. विशेष करून ज्या ठिकाणी कॉलेज आहेत त्या ठिकाणी सर्रास इ-सिगारेटची विक्री होत असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, खारघर प्रभाग ४ येथील सी लाईन आयटीएम कॉलेजजवळील कॅफे नाईन पान शॉप आणि सौरभ पान शॉपमध्ये प्रतिबंधित ई-सिगारेट सापडून आले. या कारवाईत अर्षद मोहम्मद सलीम शेख आणि मिथलेश माणिकचंद साहू यांच्याकडून ३४ हजारांचे १७ ई-सिगारेट पोलिसांनी जप्त केले आहेत.

# तंबाखूमुक्त युवा अभियान रॅली




| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड अधिकार आणि जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विधी सेवा दिन तथा तंबाखू मुक्त युवा अभिमानाच्या निमित्ताने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. समाजातील सर्वसामान्यांपर्यंत न्याय हा अधिकार आहे, दान नाही. हा संदेश पोहोचवण्याबरोबरच तंबाखूजन्य व्यसनांपासून युवा पिढीला दूर ठेवण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे ठेवण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी प्रास्ताविक करताना समाजातील गरजू दुर्बल वंचित घटकांना न्यायाच्या उपलब्ध बाबत जागृती निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली. शिस्तबद्ध पद्धतीने रॅलीची सुरुवात करून हा संदेश अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचल्या असे आवाहन त्यांनी केले. या रॅलीमध्ये जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश अलिबाग वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ए.डी. पाटील, सचिव अ‍ॅड. अमित देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, दत्ता पाटील, लॉ कॉलेज, नर्सिंग कॉलेज, वकील वर्ग व न्यायालयीन कर्मचारी तसेच अलिबाग येथील जेएसएम कॉलेज, शासकीय मेडिकल कॉलेज आणि जनरल अरुण कुमार वैद्य हायस्कूल येथील २५० हून अधिक विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी कायदेविषयक व तंबाखू विरुद्ध घोषणाबाजी केली तसेच कायदेविषयक तंबाखूमुक्त समाजाबाबत जनजागृती करणारी फलके प्रदर्शित केली.

# सोन साखळी चोर गजाआड

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघर वसाहत परिसरात मोटर सायकल वरून सोनसाखळी हिसकावून फरार होण्याचे अनेक गुन्हे घडत आहे. अशातील एक सराईत गुन्हेगाराला खारघर पोलिसांनी नाशिक-मालेगाव परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले आहे. हैदरअली सादिक अली सय्यद (३७) असे या आरोपीचे नाव असून त्याच्यावरील खारघर पोलीस ठाण्यातील तीन गुन्हे तर नाशिक येथील एक गुन्हा उघडकीस आला आहे. मागील १०-१२ दिवसांपूर्वी हा आरोपी मालेगाव परिसरात लपून बसला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर पोलिसांनी त्याला पकडले.

# शाळकरी मुलीचे फूस लावून अपहरण

## आरोपीला ओडीसातून अटक

| पनवेल | प्रतिनिधी |

कामोठे परिसरातून १६ वर्षीय अल्पवयीन शाळकरी मुलीला प्रेम ाच्या जाळ्यात ओढून तिला फूस लावून पळवून नेण्याची घटना घडली होती. तसेच, तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिला गरोदर ठेवण्यात आले होते. या प्रकरणी कामोठे पोलिसांनी आरोपीला ओडीसा येथून मोठ्या शिताफीने अटक करून त्याच्या ताब्यातून पीडित मुलीची सुटका केली आहे. तसेच, तिला तिच्या कुटुंबियांच्या ताब्यात दिले आहे. मुन्ना रविशंकर प्रधान (२१) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी कामोठे परिसरात आई-वडिलांसोबत राहत असून शाळेत शिक्षण घेत आहे. त्याच भागात कामानिमित्त राहणाऱ्या मूळच्या ओडीसा राज्यातील मुन्ना प्रधान याच्यासोबत तिचे प्रेमसंबंध जुळले होते. या प्रेमसंबंधाचा फायदा घेत आरोपी मुन्ना प्रधान याने संधी साधून या अल्पवयीन मुलीला फूस लावून तिला पळवून नेले. घरातील मुलगी अचानक बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच पीडित मुलीच्या कुटुंबियांनी तातडीने कामोठे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. दरम्यान, पीडित मुलीच्या कुटुंबियांनी मुन्ना प्रधानवर संशय व्यक्त केला. त्यानंर आरोपी मुन्ना प्रधानचा शोध घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्याचा मोबाईल बंद असल्याने पोलिसांना त्याच्या ठावठिकाणा मळित नव्हता. मात्र, पोलिसांनी तपास सुरू ठेवला असतानाच, अचानक त्याचा फोन सुरू झाला आणि त्याचे ओडीसा येथील लोकेशन पोलिसांना मळिाले. त्यानंर वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश पगारे व त्यांच्या विशेष पथकाने तात्काळ ओडीसाकडे धाव घेतली. तिथे त्यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने तपास करत मुन्ना प्रधान याला अटक करून पनवेल येथे आणले. त्यांनतर पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी असता मुन्ना प्रधान याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्यामुळे ती गरोदर असल्याचे निष्पन्न झाले. कामोठे पोलिसांनी मुना प्रधान याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले.

# म्हसळ्यात शांतता समितीची बैठक



| म्हसळा | प्रतिनिधी |

दिल्ली येथे झालेल्या बॉम्ब ब्लास्टसारख्या देशविघातक घटनांच्या पार्श्वभूमीवर तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने कायदा आणि सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी म्हसळा पोलिसांनी शांतता समितीची विशेष बैठक आयोजित केली होती. म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीस म्हसळा तालुक्यातील सर्व समाजांचे अध्यक्ष, पदाधिकारी, गणेश मंडळ प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक तसेच शांतता समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिल्लीतील बॉम्ब ब्लास्टमध्ये जीव गमावलेल्या निरपराध नागरिकांना बैठकीच्या सुरुवातीला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी समिती सदस्यांनी १९९३ च्या मुंबई बॉम्ब ब्लास्टची आठवण करून देत सुरक्षा आणि सतर्कतेची गरज पुन्हा अधोरेखित केली. तालुक्याच्या भौगोलिक स्थितीचा विचार करून महत्त्वाच्या ठिकाणी नाका तपासणी वाढवावी, सतर्क गस्त ठेवावी आणि सीसीटीव्ही यंत्रणेला अधिक बळकटी द्यावी अशी सूचना करण्यात आली.

**व्यवसायिकांच्या जीवनावरील चित्रपटाची निर्मिती | चित्रपटगृहात अभीनेत्री उर्मिला जगतापची उपस्थिती**

# पनवेलकरांनी लुटला 'रिलस्टार' पाहण्याचा आनंद

| पनवेल | प्रतिनिधी |




'धर्मवीर' या चित्रपटानंतर प्रसाद ओक पुन्हा एकदा सामाजिक विषयावर आधारित चित्रपटात झळकले आहेत. यावेळी त्यांच्यासोबत नागराज मंजुळे यांचा भाऊ भूषण मंजुळेही महत्त्वाच्या भूमिकेत दिसला. रोजबाजार करून आपल्या कुटुंबाचा गाडा खेचणाऱ्या लघु उद्योजकांच्या जीवनात राजकीय हस्तक्षेपामुळे घडणाऱ्या घटना आणि त्यानंतर होणारा उद्रेक आदी प्रसंग या चित्रपटातून समोर आणला आहे. महत्वाची बाब म्हणजे पनवेलमधील प्रेक्षकांना कल्पना नसताना अचानक या चित्रपटाच्या मुख्य नायिकेचे याठिकाणी आगमन घडवून आणण्यात आले होते. त्याचबरोबर या चित्रपटातील दोन्ही बाल कलाकारांना देखील याठिकाणी आमंत्रित करण्यात आले होते.

'रिलस्टार' या चित्रपट निर्मिती टीमचे पनवेल प्रतिनिधी म्हणून राज भंडारी आणि दीपक परुळेकर यांनी हे आयोजन केले होते. यावेळी रिलस्टार चित्रपटाची नायिका उर्मिला जगताप हिच्यासोबत चित्रपट पाहण्याचा आनंद पनवेलकरांना अनुभवता आला. प्रसाद ओक या चित्रपटात एका पत्रकाराची भूमिका साकारत असून, प्रसिद्ध न्यायाधीशाच्या मृत्यूमागचे सत्य शोधण्याचा प्रयत्न करणारा तो पत्रकार म्हणून आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम अभिनय सादर करत आहे.

तसेच, रोज बाजार करणाऱ्या व्यवसायिकांना आपल्या जीवनात येणाऱ्या घटना, समस्या काय आहेत आणि त्यातून पुढे काय काय घडतंय हे दाखविण्याचा प्रयत्न लेखक महेंद्र पाटील यांनी केला आहे. या चित्रपटाची एक विशेष खासियत म्हणजे साऊथचे प्रसिद्ध दिग्दर्शक सिम्मी रॉबिन यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. त्यांना मराठी आणि हिंदी भाषा अवगत नसतानाही त्यांनी मराठी चित्रपटासाठी आपले कौशल्य दाखविले आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनासाठी नंदू आचरेकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. यावेळी रिलस्टार चित्रपटाच्या अभिनेत्रीसोबत चित्रपट पाहून तिच्याशी हितगुज साधण्याची संधी दिल्याबद्दल पनवेलमधील रसिक प्रेक्षकांनी राज भंडारी आणि दीपक परुळेकर यांचे विशेष आभार मानले.

# साडेपाच लाखांची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

एका चोरट्याने घराच्या गॅलरीतून घरात घुसून, सोन्याचे दागिने मोबाईल व रोख रक्कम असा सव्वापाच लाखांचा मुद्देमाल चोरला आहे. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तळोजा फेज १ मधील तळमजल्यावरील एका घराच्या गॅलरीतून, एका चोरट्याने घरात प्रवेश केला. त्याने त्या घरातील कपाटातून ५ लाख १० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, १५ हजार रुपयांचे मोबाईल व २० हजार रुपयांची रोख रक्कम, असा एकूण ५ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. तळोजा पोलीस पुढील तपास करत आहेत.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स, चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क- ९४२२६९०८५३,७८७५६८३७७३
- कंपनी अधिकाऱ्यांच्या गृपकरीता भाडेतत्त्वावर १२०० स्वे.फुट दोन बेडरूम किचन व हाप बेडरूम ३०० फुट गॅलरीसह अधिकाऱ्यांच्या गाड्यांच्या पार्किंगसह कॉटेज सर्व सोयीयुक्त भाडेतत्त्वावर देणे आहे. संपर्क - ८०१०६३४३५७
- पाहिजे अलिबागमधील पॅथॉलॉजीकल लॅबमध्ये सकाळी नऊ ते पाच वाजेपर्यंत कामासाठी मदतनीस मावशी पगार आठ हजार संपर्क- ९३७२५४९५३२
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माणगावमधील काळ प्रकल्पाची दुरवस्था

## पाण्याची पातळी घसरली; सिंचन घटले, शेतकरी हवालदिल



। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील काळ प्रकल्पाची सध्या दुरवस्था झाली आहे. जो एकेकाळी शेतीसाठी जीवनदायी मानला जात होता, तो आज अपुऱ्या देखभालीमुळे अक्षरशः मृतप्राय झाला आहे. सिंचनाचा प्रवाह घटला असून, अनेक ठिकाणी गळती वाढली आहे. त्यामुळे पाण्याच्या कमतरतेने शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत.

सुमारे ५० वर्षांपूर्वी, १९७० च्या सुमारास सुरू झालेल्या या प्रकल्पाचा उद्देश माणगाव आणि परिसरातील ३५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणे हा होता. शासनाने सुमारे ११० कोटींचा खर्च करून हा प्रकल्प उभारला. सुरुवातीला काही गावांपर्यंत पाणी पोहोचले आणि दोन वर्षे शेतीला दिलासा मिळाला, परंतु नंतर कालव्यांमध्ये गळती, गाळ साचणे आणि दुरुस्तीचा अभाव यामुळे प्रकल्पाची कार्यक्षमता कोलमडली. आजच्या घडीला केवळ १८०० हेक्टर क्षेत्रावरच सिंचन होते, असे स्थानिक जलसंपदा विभागाचे म्हणणे आहे. अनेक गावांत कालव्यांतून पाणी येणेच बंद झाले आहे. २०१० मध्ये तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते कालव्यांची दुरुस्ती झाली होती, परंतु ती तात्पुरती ठरल्याने गळती पुन्हा सुरू झाली. परिणामी शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा धुळीला मिळाल्या. शेतकरी सांगतात, की पूर्वी भात, भाजीपाला, कलिंगड, खरबूज घेत होतो. आता शेती वाळवंटी झाली आहे. विहिरी कोरड्या पडल्या, तलावात पाणी टिकत नाही. काहींनी उद्वेगाने सांगितले, की जमीन सरकारने घेतली, पण नोकरीचे आश्वासन पाण्यात गेले. पाण्याअभावी कडधान्ये घेतो, पण गुजराण होत नाही. उपासमारीची वेळ आली आहे.

भूजल विभागाच्या अहवालानुसार, माणगाव तालुक्यातील भूजल पातळी मागील आठ वर्षांत सुमारे तीन मीटरने खाली गेली आहे. चारापिके आणि जनावरांसाठी पाणीटंचाई निर्माण झाली आहे, शिवाय झपाट्याने वाढलेल्या नागरीकरणामुळे कालवे आणि नाले अतिक्रमणाखाली गेले आहेत, ज्यामुळे पाण्याचा प्रवाह आणि साठवण दोन्ही बाधित झाले आहेत. सध्या या प्रकल्पाचा लाभ फक्त आठ ते १० गावांनाच मिळतो, तर मूळ आराखड्यात २३ गावांचा समावेश होता. काही ठिकाणी कालवा तुटला, तर काही ठिकाणी गाळ साचल्याने पाणी शेतीपर्यंत पोहोचत नाही. तज्ज्ञांचे मते, काळ प्रकल्प व उपकालव्यांची तत्काळ दुरुस्ती, गाळ काढणी आणि गळती बंदी करणे आवश्यक आहे. तसेच, ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन, भूजल पुनर्भरण प्रकल्प आणि ग्रामीण जलसंवर्धन समित्या सक्रिय करण्याची गरज आहे.

# उद्यमशिलतेतून महिलांनी सक्षम व्हावे

## • जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन



। पनवेल । वार्ताहर ।

उद्यम शिलतेतून सक्षम व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) अहमदाबाद उदया प्रकल्प कार्यालय अलिबाग व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई पुरस्कृत नावडे पनवेल को ऑफ इंडस्ट्रीज सभागृह पनवेल येथे आयोजित महिलांकरीता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात केले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल तहसिलदार मिनल भांबरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या, रायगड जिल्हा बँक तळोजाचे व्यवस्थापक नितेश तोंडसे, उद्योजक विजय लोखंडे, उद्योजक लक्ष्मण जाधव, उद्योजिका राजश्री पाटील उपस्थित होते.

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) व टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायीत्व विभागाकडून पुरस्कृत उदया प्रकल्पांतर्गत दोन आठवडे कालावधीचे महिला व दिव्यांगांकरीता उद्योजकता विकास कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमात सर्व प्रथम ईडीआयचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवून नावडे येथील महिला प्रशिक्षणार्थींनी सुरु केलेल्या माऊली भाकरी सेंटरचे उद्घाटन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाकरीता रायगड जिल्हा बँकेचे व जिल्हा उद्योग केंद्राचे मोलाचे सहकार्य लाभले.

### संजीवन समाधी सोहळा

# ‘आरोग्याची वारी आळंदीच्या दारी’

। पनवेल । प्रतिनिधी ।

संजीवन समाधी सोहळा आळंदी येथे पार पाडत असताना आरोग्याची वारी आळंदीच्या दारी ही संकल्पना घेऊन शेतकरी कामगार पक्षाच्या डॉक्टर सेलच्या वतीने डॉ. राहुल भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि. १४) वारकरी संप्रदायाच्या आरोग्यासाठी मोफत आरोग्य तपासणी व मोफत आरोग्य उपचार श्री क्षेत्र आळंदी आगरी धर्मशाळा या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

यावेळी पनवेल परिसरातील डॉ. संतोष जगे, डॉ. अभिजित भोईर, डॉ. वैभव कोपरकर, डॉ. स्वप्नील भोईर, डॉ. स्वप्नील घरत, डॉ. रोशन पाटील, डॉ. अमोल राजे, डॉ. अमर राजे. शेतकरी कामगार पक्ष हा नेहमीच समाज उपयोगी कामे करण्यास अग्रेसर आहे. तो नेहमी समाजाला उपयुक्त असे कार्यक्रम राबवत असतो यामध्ये आरोग्य तपासणी, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप आदी कार्यक्रम माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबवले जातात.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना माजी आमदार बाळा पाटील यांनी सांगितले शेतकरी कामगार पक्ष डॉक्टर सेलचे अध्यक्ष राहुल भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोग्य तपासणीचे शिबीर आयोजित करण्यात आले. कारण येथे येणारा वारकरी हा पायी चालत येतो आणि इथे आल्यानंतर त्याला मोफत औषध उपचार दिल्यामुळे त्याच्यातील ऊर्जा ही पुन्हा वाढते आणि तो पुन्हा जोमाने वारकरी संप्रदायाच्या कामाला सुरुवात करत असतो.




# संजय कदम यांचा कोमसाप तर्फे विशेष सत्कार



। पनवेल । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनातर्फे वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिन समितीवर शासकीय तालुकास्तरीय समितीवर निवड झाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल, पनवेल शाखा आयोजित साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कविसंमेलनाचे आयोजन पनवेल येथे करण्यात आले होते. या सोहळ्यादरम्यान सोहळ्याचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर, सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, ज्येष्ठ गझलकार ए. के. शेख, नवीन पनवेल शाखा अध्यक्ष गणेश कोळी, पनवेल शाखा अध्यक्ष सुभाष कुडके, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी उपमहापौर चारुशीला घरत आदींच्या उपस्थितीत संजय कदम यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# विना परवाना दारू विकणाऱ्याला अटक

**रसायनी** : चावंढोळी गावच्या हद्दीमध्ये अंकुश भुवड यांच्या चाळीलगत शासनाचा कोणताही परवाना नसताना अवैधरित्या देशी व विदेशी दारू विक्री करणारा चंदनकुमार लंबोदर संतरा (वय २६, सध्या राहणार चावंढोळी, मुळ राहणार-रंगापती ओडिसा) याला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबागचे सह फौजदार संदीप पाटील यांनी देशी, विदेशी दारूसह ताब्यात घेतले असून त्याच्यावर महाराष्ट्र प्रोव्हीशन ॲक्ट नुसार कारवाई करण्यात आली आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धामणी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५३/६ | एकूण क्षेत्र १-१५-०० हे.आर. | १.०० |

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १४३/१/अ/३ | एकुण क्षेत्र १-१७-०० हे.आर. यापैकी एकनाथ मारुती पाटील व इतर २ यांचे खाते क्र. ४६० ज्याचे क्षेत्र ०-३७-०० हे.आर या मिळकतीबाबत | ०.२७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- १७/११/२०२५

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७




# चौकमध्ये जनजाती गौरवदिन उत्साहात साजरा

। रसायनी । प्रतिनिधी ।

सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक शाळेत भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती मजनजाती गौरव दिनफ म्हणून मोठ्या उत्सवात साजरा केला.

विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेचे सचिव योगेंद्र शहा यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात केली. पाहुण्यांचे स्वागत कुमारी पूजा निरगुडा, कुमारी सिद्दी वाघे, कुमारी मनिषा वाघमारे या मुलींनी पुष्पगुच्छ देऊन केले. नववीची विद्यार्थिनी कुमारी श्राव्या मोरे आणि इंग्लिश शिक्षक हरेश पडवळ यांनी मनोगत व्यक्त केले.

### भालीवडी कन्या आश्रमशाळेत

# जनजाती गौरव दिवस उत्साहात साजरा



। रायगड । वार्ताहर ।

जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भालीवडी (ता. कर्जत) येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळेत जिल्हास्तरीय जनजाती गौरव दिवस कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदिवासी समाजासाठीच्या संदेशाचे प्रक्षेपणही करण्यात आले.

जनजाती गौरव दिनाचे औचित्य साधून प्रकल्पामार्फत सात नवीन बहुउद्देशीय केंद्रांचे उद्धाटन करण्यात आले. रोहा तालुक्यातील लांढर आदिवासी वाडी येथील केंद्राचे उद्घाटन महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या शुभहस्ते झाले. या केंद्रांद्वारे आदिवासी समाजाचे शैक्षणिक, सामाजिक सक्षमीकरण व शासकीय योजना गावागावात पोहोचविण्याचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आश्रमशाळेतील विविध स्पर्धेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींना जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी पालक, शिक्षक आणि स्थानिक मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या आदिवासी नृत्य, गीत आणि संस्कृतिक कला सादर केले.

परीक्षेत यश मिळवून रायगडचा गौरव वाढविणाऱ्या नयन वाघ यांचा जिल्हाधिकारी जावळे व प्रकल्प अधिकारी ती तेजस्विनी गलांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या गावी सुरू असलेल्या पोलीस भरती अकॅडमीसाठी १० स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे संच प्रदान करण्यात आले.


### जाहीर सूचना

आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की,

आम्ही खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेसंदर्भात श्री. मकरंद सुरेश नार्वेकर यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत, ज्यांचा असा दावा आहे की ते सदर मालमत्तेचे मालक आहेत.

कोणीही व्यक्ती/घटक/सरकारी विभाग वा प्राधिकारी यांचा खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेमध्ये विक्री, हस्तातंरण, विनिमय, प्रभार, भार, गहाण (समतुल्य वा अन्य), अनुज्ञप्ती, न्यास, निवास हक्क, गहाण, हमी, आगाऊ रकमा, भाडेकरार, प्रभार, विनिमय, भेट, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, पूर्वक्रय अधिकार, अभिहस्तांकन, वारस, वहिवाट, उप-वहिवाट, सामंजस्य करार, उत्तराधिकार, ताबा, कब्जा, हिस्सा, देखभाल, मृत्यूपश्चात वारसा, सुविधाधिकार, विमोचन, परित्याग वा अन्य विकास कराराच्या माध्यमातून अन्य कोणत्याही पद्धतीद्वारे, संयुक्त उद्यम, संयुक्त विकास, प्रकल्प व्यवस्थापन करार, बांधकाम कंत्राट, महसूल/नफा/क्षेत्र/हक्क हिस्सेदारी करार, निषेधाज्ञा, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, मंच वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांच्याद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हिस्सा, हक्क, अधिकार, दावा, प्रभाल, हरकत, मागणी वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात आम्हाला लिखित स्वरूपात मूळ सहाय्यक दस्तावेजांसमवेत

अशा हरकती/दावे/हितसंबंध/तपशील, काही असल्यास, त्याचे वर्णन करून सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत पीएसजे लीगल, वकील व सॉलिसिटर्स यांना

पत्ता ८०८, सनशाइन टॉवर्स, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०१३ येथे सूचित करावे किंवा

prach.joshi@psjlegalc.com

येथे आम्हाला ई-मेल पाठवावा अन्यथा मालक हे मालमत्तेचे संपूर्ण हक्कदार आहेत असे समजण्यात येईल आणि असा दावा/हरकत/हितसंबंधाच्या कोणत्याही संदर्भाविना यासंदर्भातील हक्क चौकशी व व्यवहार पूर्ण करण्यात येईल व ते सर्व हेतूने व दृष्टीने अधित्यागित व परित्यागित समजण्यात येतील.

**वरील संदर्भित मालमत्तेचे विवरण**

पुढील विवरणीत बिगर शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूकंड, गाव मापगाव, तालुका अलिबाग व जिल्हा रायगड येथील व खालील विवरणीत गट क्रमांक व क्षेत्र (एच आर पी) यानुसार.

| अ. क्र. | गट क्र. - | क्षेत्र एच. आर. पी./तत्सम |
|---|---|---|
| १. | २५३ | ३९-८०-०० |
| २. | २५४ | २५-५०-०० |
| ३. | २५६ | २४-५०-०० |
| ४. | २५८ | ११-१०-०० |
| ५. | २५९ | ६३-१०-०० |
| | एकूण | १६४-००-०० |
| | | अर्थात १६-४०-००० चौ मी. अंदाजे |

दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२५
पत्ता : पीएसजे लीगल, वकील व सॉलिसिटर्स, ८०८, सनशाइन टॉवर, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०१३



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# परसबाग स्पर्धेत सरस्वती विद्यामंदिर वडघर प्रथम




। माणगांव । प्रतिनिधी ।

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे विद्यालयास, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत आयोजित परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. विद्यालयाने ११,००० रुपयांचे पारितोषिक जिंकत अभिमानास्पद कामगिरी केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये शासन स्तरावर घेण्यात आलेल्या या स्पर्धेत माणगाव तालुक्यातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विद्यालयाने प्राप्त केले आहे.

शाळेने सेंद्रिय पद्धतीने विकसित केलेल्या परसबागेत भाजीपाला, फळझाडे, औषधी वनस्पती, फुलझाडे, तसेच पाणी संवर्धन व जैविक खताचा वापर अशा अनेक उपक्रमांची उत्कृष्ट मांडणी केली होती. या उपक्रमात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग, पर्यावरणपूरक पद्धतीचा अवलंब आणि स्वच्छतेची अंमलबजावणी पाहणी समितीने विशेषत्वाने गौरवली आहे.

विविध सामाजिक, सांस्कृतिक व ज्ञानरचनावादी शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या सरस्वती विद्यामंदिर वडघर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात भाजीपाला लागवड केली आहे. सदर लागवडी अंतर्गत भोपळी, वांगी, शिराळी, तोंडली, मिरची इत्यादी पीक घेतले आहे.

गेल्या काही दिवसांपासून हा भाजीपाला तयार झाला आहे.

विद्यालयाने शालेय परिसरात असलेल्या जागेचा उपयोग करून यापूर्वी भाजीपाला लागवडीचा प्रयोग यशस्वी केला आहे. यामध्ये वांगी, कोथिंबीर इत्यादी फळभाज्यांचे उत्पादन घेतले आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन पाटील यांनी मेहनत घेत विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यालय परिसरात भाजी लागवड केली आहे. सदर रोपांची योग्य ती निगा राखून व वारंवार देखभाल करण्यात आली.

या बागेत तयार होणारा भाजीपाला शाळेतील पोषण आहारात वापरला जातो. विध्यार्थी व शिक्षक यांच्या मेहनतीचे मान्यवरांकडून कौतुक होत आहे. भाजीपाला लागवड यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक गजानन पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी मेहनत घेतली त्यांना प्र. परिचर रामदास सावंत यांनी सहाय्य केले. शाळेत लागवड केलेली भाजी उत्पादन सुरू झाल्याने व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने शिक्षक, पालक, विद्यार्थी आनंदित झाले असून त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. विद्यालयास प्राप्त झालेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर नंदकिशोर जोशी सरचिटणीस डॉक्टर निलेश रेवगडे, शाळा समिती अध्यक्ष, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, माजी विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे.

# घरातील दरवाजाचे कडीकोयंडा तोडून १६ लाखांची चोरी



। पनवेल । प्रतिनिधी ।

घरात कोणी नसताना दरवाज्याचा कडी-कोयंडा तोडून आत कपाटामध्ये ठेवलेले दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे १६ लाख रुपये किमतीची ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात भरदिवसा घडली आहे.

चैतन्य काळे यांचे घराचे दरवाजे बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने दरवाज्याचा कडी-कोयंडा तोडून आत कपाटामध्ये ठेवलेले १५ लाख ३५ हजार रुपये किमतीचे दागिने व ६० हजार रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| **Tend-5/25-26 7000037416 ..3rd call** | Procurement of 33kV PT & 22kV PT required at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST** | **Rs. 540724/-** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 14.11.2025 to 24.11.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 24.11.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202 E-mail ID: **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# नागोठण्यात कूच बिहार ट्रॉफीचा शुभारंभ



**। रायगड/ नागोठणे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील रिलायन्स नागोठणे येथील क्रिकेट स्टेडियमच्या मैदानावर रविवार (दि.१६) नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील सामन्याला शुभारंभ करण्यात आला. कूच बिहार ट्रॉफी ही भारतीय क्रिकेट नियामक मंडळाद्वारे (बीसीसीआय) तर्फे आयोजित केली जाणारी १९ वर्षांखालील खेळाडूंसाठीची एक महत्त्वाची राष्ट्रीय चार दिवसीय क्रिकेट स्पर्धा आहे. रिलायन्स नागोठणे विभागाचे अध्यक्ष शशांक गोयल, परेश ठाकूर, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक, सामना अधिकारी विनीत विओला, रिलायन्सचे जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामन्याला सुरवात करण्यात आली.

- **महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा यांच्यात सामना**
- **क्रिकेटचा महासंग्राम बघायला तरुणांची गर्दी**

यावेळी बीसीसीआयचे ज्येष्ठ व्हिडिओ विश्लेषक सदानंद प्रधान यांनी बीसीसीआयसाठी १८ वर्ष सेवा यशस्वी रित्या पूर्ण केल्या बद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सामन्याचे सामना अधिकारी, पंच, गुणलेखक व सामना यशस्वी करण्यासाठी मेहनत घेणाऱ्या प्रत्येक विभागाच्या लोकांचा सामना सुरू होण्यापूर्वी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

### सामना पाहण्याचे आवाहन

कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील हा सामना पाहण्यासाठी सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व अकॅडमी व क्लबच्या खेळाडू व क्रिकेट प्रेमी लोकांनी सामना पाहण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी केले आहे.

कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील हा साखळी फेरीतील सामना असून सामना १६ ते १९ नोव्हेंबर असा चार दिवसीय असणार आहे. ह्या सामन्यासाठी रिलायन्स नागोठणे प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली असून सुसज्ज मैदान, सुरेख खेळपट्टी, खेळाडूंसाठी चांगल्या दर्जाचे पॅव्हेलियन व सुरक्षा व्यवस्था रिलायन्स कडून करण्यात आली आहे.

रिलायन्स कॉर्पोरेट सर्व्हिसेसचे प्रमुख पुनीत मिश्रा, हॉर्टिकल्चर विभागाचे प्रमुख शरद पवार, हॉर्टिकल्चर विभागाचे सदस्य शांताराम करंजे, सिव्हिल डिपार्टमेंटचे प्रतिनिधी इस्माईल पिट्टू, विद्युत विभागाचे प्रतिनिधी राशिद दापोलकर, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश पाटील, खजिनदार प्रशांत ओक, सहसचिव जयंत नाईक, सदस्य ॲड. पंकज पंडित, शंकर दळवी, सुयोग चौधरी, संदीप जोशी, रवी सोलंकी, डॉ. राजाराम हुलवान, मिलिंद मांढरे, रोहित कार्ले उपस्थित होते.

## मुंबई शहर जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# विजय क्लब, सिद्धिप्रभा, यांनी पश्चिम, तर साऊथ कॅनराची उपांत्य फेरीत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विजय क्लब, सिद्धिप्रभा, यांनी पश्चिम, तर साऊथ कॅनरा, गुड मॉर्निंग यांनी पूर्व विभागात मुंबई शहर कबड्डी असो. ने आयोजित केलेल्या निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमार गटात अंतिम फेरी गाठली. मुंबईतील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर सुरु असलेल्या पश्चिम विभागातील कुमारांच्या उपांत्य फेरीत विजय क्लब- 'अ' ने चुरशीच्या लढतीत गोलफादेवीला २९-२६ असे पराभूत केले. आर्यन शर्मा, प्रिन्स मायकल, मनिष वासकर विजयकडून, तर पंकज घाडी, करण गुड्डीत गोलफादेवीकडून उत्तम खेळले. सिद्धिप्रभा फॉउंडेशनने जय भारतचा ६५-३८ असा सहज पाडाव केला. पूर्वार्धात एकमेकांचा अंदाज घेत दोन्ही संघानी सावध खेळ केल्यामुळे २३-२२ अशी सिद्धिप्रभाकडे आघाडी होती. सिद्धेश भोसले, विशाल घाडी, वेदान्त पवार यांच्या उत्तरार्धातील झंझावाती खेळाने त्यांनी गुणांचे अर्धशतक पार करीत मोठा विजय मिळवला. पूर्व विभागातील कुमारांच्या उपांत्या सामन्यात पहिल्या डावातील १६-२१ अशा पिछाडीवरून साऊथ कॅनराने चुरशीच्या लढतीत काळाचौकीच्या अमर मंडळाला वर ४४-३८ असा विजय मिळविला. विश्रांतीनंतर सूर सापडलेल्या चिराग लिमकर, गुरुप्रसाद पंडित यांनी कडवी लढत देत सामना साऊथ कॅनराच्या बाजूने झुकवीला. रमेश रासकर,साहिल बनगर यांचा पहिल्या डावातील खेळ दुसऱ्या डावात बहारला नाही. शेवटच्या सामन्यात गुड मॉर्निंगने शिवनेरी सेवाला ४३-२४ असे नमवीत अंतिम फेरी गाठली. दिनेश गवळी, सक्षम सूर्यवंशी, श्रवण तिरोडकर यांनी विजयी संघाकडून चौफेर खेळ केला. शिवनेरीचे यश चोरगे, आर्यन सुहास चमकले.



कुमारी गटाच्या पूर्व विभागात श्री स्वामी समर्थ मंडळाने शताब्दी स्पोर्ट्स्‌चा ३१-२२ असा, जिजामाता महिला संघाने महर्षी दयानंदचा ५१-३० असा, तर डॉ. शिरोडकरने वीर स्पोर्ट्स्‌चा ५३-२७ असा पराभव करीत उपांत्या फेरी गाठली. कुमारी गटाच्या पश्चिम विभागात शिवशक्ती महिला 'अ' संघाने अंकुर स्पोर्ट्स्‌चा, भारतमाता स्पोर्ट्स्‌ने गोलफादेवी प्रतिष्ठानचा, अमरहिंद मंडळाने चंद्रोदय मंडळाचा, तर शिवशक्ती महिला ब संघाने विश्वशांती मंडळाचा ४८-२० असे नमवीत उपांत्य फेरीत धडक दिली.

## निवडक

### मृणाल भारतीय लॅक्रोस संघात



**नागपूर :** मृणाल श्यामकुंवरची रियाध (सौदी अरेबिया) येथे होणाऱ्या आशियाई लॅक्रोस स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा १८ ते २३ नोव्हेंबरदरम्यान पार पडणार आहे. या स्पर्धेसाठी निवड झालेला मृणाल हा महाराष्ट्रातील एकमेव खेळाडू आहे. भीम चौक, जरीपटका येथे राहणाऱ्या मृणालने राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये तीनवेळा आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्ये चारवेळा सहभाग घेतला आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावर केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याची भारतीय संघात निवड झाली आहे. मृणालला आतापर्यंतच्या प्रवासात महाराष्ट्र लॅक्रोस असोसिएशनचे सचिव मोहम्मद बाबर, सुधीर रांशूर, भीम वादळ ग्रुपचे अंशुल खोब्रागडे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले आहे.

### शौर्याच्या शिरपेचात मानाचा तुरा



**ठाणे :** ठाण्याची फ्रंटीयर एक्स्प्रेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शौर्या अंबुरेनं आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. यावेळी शौर्याने बहरीनमध्ये झालेल्या आशियाई युवा क्रिडा स्पर्धेत रुपेरी कामगिरी साधली आहे. या स्पर्धेत शौर्यानं आपली आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी साधताना १०० मीटर हर्डल्स शर्यतीत १३:७३ सेकंद अशी वेळ नोंदवत रौप्यपदक मिळवले. विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये छाप पाडणाऱ्या शौर्यानं आता आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील आपली दखल घ्यायला लावली आहे. शौर्या आपलं ध्येय साध्य करण्यासाठी मैदानावर, ट्रॅकवर खडतर सराव करत होती. सरावाच्या बाबतीत तिनं कधीच टंगळमंगळ केली नाही. हे रौप्यपदक त्याचंच फळ आहे. भविष्यात देखील यापेक्षा सरस कामगिरीची तिच्याकडून अपेक्षा असल्याचं तिचे प्रशिक्षक अजित कुलकर्णी यांनी सांगितले.

# रासळ संघ सुधागड चषक स्पर्धेचा मानकरी

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने सुधागड चषक २०२५ चे भव्य दिव्य आयोजन शनिवार (दि. १५) रोजी क्रीडासंकुल पाली येथे करण्यात आले होते.



सुधागड तालुक्यात तालुका चषकानी कबड्डी हंगामाला सुरुवात झाली. स्पर्धेत तालुक्यातील सर्व कबड्डी संघानी आपला प्रवेश नोंदविला होता.

कबड्डी स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमीनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. स्पर्धेतील अंतिम लढत जय हनुमान रासळ विरुद्ध भैरवनाथ वावे संघात झाली. स्पर्धेच्या अंतिम लढतीत रासळ संघाने बहारदार खेळ करत प्रथम क्रमांकाला गवसणी घातली. तर द्वितीय क्रमांक वावे, तृतीय क्रमांक स्वयंभू हनुमान चिवे तर चतुर्थ क्रमांक नागशेत सर्व विजयी संघांना सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू वैभव खाडे (रासळ), सर्वोत्कृष्ट चढाई प्रसाद हिर्डेकर (वावे), उत्कृष्ट पक्कड राजू ठाकूर ( चिवे) या सर्व खेळाडूंना असोसिएशनच्या वतीने आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

## कुस्ती स्पर्धेत निषाद मांडवेचे यश

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

खोपोली जि. रायगड येथे झालेल्या राज्यस्तरीय फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत सतरा वर्षे वयोगटातील ८० किलो वजनी गटामध्ये सातार्डा येथील महात्मा गांधी विद्यामंदिरचा विद्यार्थी निषाद मांडवे याने द्वितीय क्रमांक प्राप्त करूत रौप्यपदक पटकावले. त्याने स्पर्धेत नेत्रदीपक यश संपादन केल्याने सातार्डे मध्यवर्ती संघाचे पदाधिकारी, शाळा समिती, मुख्याध्यापक पी. एम. सावंत, शिक्षक, पालकवर्ग व ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले. निषादला मुख्याध्यापक सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशा बद्दल सर्वांनी त्याचे अभिनंदन केले.

# समाधानचे उल्लेखनीय यश

**। पंढरपूर । प्रतिनिधी ।**

पंढरपूर सायकलर्स क्लबचे सदस्य आणि देशसेवेत कार्यरत असलेले सोनके गावचे पॅरा कमांडो समाधान थोरात याने यंदाच्या गोवा हाफ आयर्नमॅन ७०. ३ या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवत पंढरपूर तालुक्याचा मान उंचावला आहे. गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी होत त्यांनी ही कठीण स्पर्धा केवळ ५ तास २८ मिनिटांत पूर्ण केल्याने थोरात हे वर्ल्ड हाफ आयर्नमॅन चॅम्पियनशिपसाठी पात्र ठरले आहेत. या स्पर्धेत स्पर्धकांना १.९ किमी. पोहणे, ९० किमी सायकलिंग आणि २१.२ किमी धावणे असा एकूण टप्पा ८ तास ३० मिनिटांत पूर्ण करावा लागतो. त्यातही ५ तास ३० मिनिटांच्या आत स्पर्धा पूर्ण केल्यास वर्ल्ड हाफ आयर्नमॅन चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळते. समाधान थोरात यांनी ही स्पर्धा केवळ ५ तास २८ मिनिटांत पूर्ण केल्याने त्यांची फ्रान्स येथे होणाऱ्या वर्ल्ड हाफ आयर्नमॅन चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. पहिल्याच प्रयत्नात दमदार कामगिरी करत त्यांनी आपल्या जिद्दीचे व मेहनतीचे सर्वोत्तम उदाहरण साकारले आहे. यापूर्वी त्यांनी सायकलिंगमधील नामांकित डेक्कन क्लिप हँगर-पुणे टू गोवा (६४९ किमी) ही स्पर्धाही केवळ ३५ तासांत पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी केली होती. दोन भिन्न आणि अत्यंत आव्हानात्मक स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल समाधान यांचे विविध स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# जगदीश क्रिकेट अकॅडमी संघाचा अंतिम फेरीत

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित चौदा वर्षांखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या सामन्यात जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाने पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी संघावर दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीच्या सामन्यासाठी प्रवेश निश्चित केला आहे. प्रथम फलंदाजीला आलेल्या पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी संघाने ४० षटकात १० गडी बाद ११९ धावा फलकावर नोंदवल्या, त्यामध्ये कर्णधार देव सिंग यांनी सर्वाधिक ३२ तर शौर्य घरत यांनी ३० धावांचे योगदान संघाला दिले. जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाकडून यश पाटील यांनी ३ हर्षित सिंग स्वराज चौगुले यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले. १२० धावांचे लक्ष देऊन फलंदाजीला आलेल्या अलिबागच्या संघ दणदणीत फलंदाजी करत ३५ व्या षटकात अवघे ४ गडी गमावत १२० धावांचे लक्ष पूर्ण केले जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाचा ओम कावळे यांनी नाबाद ८१ धावा काढल्या व आपल्या संघाला सामना एक हाती जिंकून दिले. अंतिम फेरीत जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाचा सामना रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाबरोबर होणार आहे. ज्युनिअर वयोगटात अलिबागचा संघ अनेक वर्षानंतर फायनल मध्ये दाखल झाल्याने अलिबाग तालुक्यातील क्रिकेट प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आयर्नमॅन 70.3 स्पर्धेत

# भारतीय वायुदलाचा दबदबा

**। पणजी । वृत्तसंस्था ।**

उझबेकिस्तानचा कॉन्स्टंटिन बेलोसोव्ह व ब्रिटनची एली गॅरेट यांनी आयर्नमॅन ७०.३ स्पर्धेत अनुक्रमे पुरुष व महिला गटात अव्वल क्रमांक प्राप्त केला. सांघिक गटात भारतीय वायुदलाने दबदबा राखला. या कठीण स्पर्धेत १.९ किलोमीटर सागरी जलतरण, ९० किलोमीटर सायकलिंग आणि २१.१ किलोमीटर धावण्याचा समावेश होता. खडतर अशा स्पर्धेला रविवारी सकाळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मिरामार समुद्रकिनारी बावटा दाखवून आरंभ केला. यावेळी पर्यटन संचालक केदार नाईक, स्पर्धा संचालक दीपक राज, स्पर्धेची सदिच्छा दूत अभिनेत्री सैयामी खेर, नील डिसिल्वा, सुनील मोरजकर यांची उपस्थिती होती. ३१ देशांतील सुमारे १३०० ट्रायथलिट्सनी स्पर्धेत भाग घेतला होता.



एलिसा हेलीच्या ऑस्ट्रेलियाने सर्वात मोठे लक्ष्य पार करत घडवला इतिहास.पुरुष गटात उझबेकिस्तानच्या कॉन्स्टंटिन बेलोसोव्हने चार तास २५.४७ मिनिटांत विजेतेपद पटकावले, तर महिला गटात ब्रिटनच्या एली गॅरेट हिने पाच तास १८.४३ मिनिटे वेळ दिली. सांघिक गटात भारतीय वायुदलाचे तिन्ही संघ प्रभावी ठरले. त्यांनी पहिले तिन्ही क्रमांक पटकावले. पतीसमवेत पूर्ण केले आव्हानमहिला विजेती एली गॅरेट हिने पती टॉम याच्यासमवेत खडतर आव्हान पूर्ण केले. टॉम याला चार तास ५१.३७ मिनिटे वेळेसह आठवा क्रमांक मिळाला. या ब्रिटिश जोडप्याने आतापर्यंत तीस अर्ध्या अंतराच्या, तर १० पूर्ण अंतराच्या आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण केल्या आहेत. एली म्हणाली, की ही माझ्या आयुष्यातील सर्वांत कठीण, तेवढीच सर्वांत उत्कृष्ट स्पर्धा ठरली. निकाल : पुरुष गट : कॉन्स्टंटिन बेलोसोव्ह (उझबेकिस्तान, ४:२५.४७), मायकल लेहनिग (जर्मनी, ४:३६.४२), मायकल झोल्सर (चेक प्रजासत्ताक, ४:४२.१९). महिला गट : एली गॅरेट (ब्रिटन, ५:१८.४३), टिमटिम शर्मा (भारत ५:२३.२७), ल्युसी ब्लॅन्चर्ड (ब्रिटन, ५:३२.०४)

## वर्ल्ड टेस्टमध्ये भारताची घसरण

**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**

कोलकाता दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाला ३० धावांनी पराभव पत्करावा लागला. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, चौथ्या डावात भारता समोर १२४ धावांचं लक्ष्य होतं. त्यांचा दुसरा डाव फक्त ९३ धावांवर संपला, ज्यामुळे त्यांना पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या चौथ्या आवृत्तीच्या पॉइंट टेबलमध्ये भारताच्या स्थानावरही लक्षणीय परिणाम झाला आहे, ज्यामुळे ते चौथ्या स्थानावर घसरले आहेत.

## मुंबई जिल्हा खो खो निवड चाचणी | महिला गटात शिवनेरी सेवा मंडळ विजय

# पुरुषामध्ये विद्यार्थी क्रीडा केंद्राची वैभव स्पोर्ट्सवर मात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने कै. दत्ताराम गायकवाड फाउंडेशन पुरस्कृत व ओम साई ईश्वर सेवा मंडळ लालबाग आयोजित पुरुष आणि महिला मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा आयोजित करण्यात आलेली असून सदर स्पर्धेचे उद्घाटन खासदार अरविंद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. हि स्पर्धा मनोरंजन मैदान पेरू कंपाउंड लालबाग येथे सुरु आहे. उद्घाटनीय सामन्यात महिला गटामध्ये शिवनेरी सेवा मंडळाने वैभव स्पोर्ट्स क्लबवर १२-८ (मध्यंतर ६-२) असा चार गुणांनी विजय मिळवला.



शिवनेरी सेवा मंडळच्या आयुशी गुप्ताने (४ मि: २ मि. संरक्षण व ३ गुण) अष्टपैलू खेळ केला, त्यांच्याच मुस्कान शेखने (दोन्ही डावांमध्ये प्रत्येकी २.३० मि. संरक्षण) सुंदर साथ दिली, वैभव स्पोर्ट्स क्लबच्या अवंतिका अंबोकरने (२.३०, २ मि. संरक्षण व १ गुण) व सलोनी सावंत (२.३०, १.३० मि. संरक्षण व २ गुण) सुंदर खेळी करत त्यांना उत्तम लढत दिली मात्र त्या आपल्या संघाला पराभवापासून वाचवू शकल्या नाहीत.

### एकतर्फी लढतीचा प्रयत्न

पुरुष गटाच्या सामन्यामध्ये परळच्या विद्यार्थी क्रीडा केंद्राने दादरच्या वैभव स्पोर्ट्स क्लबवर १७-१३ (मध्यंतर १७-६) असा एक डाव व चार गुणांनी विजय प्राप्त केला. विद्यार्थी क्रीडा केंद्राच्या जनार्दन सावंत (२ मि. संरक्षण), तर आक्रमणामध्ये ओमकार मिरगळने तब्बल पाच बाद करत आपलं धारदार आक्रमण प्रदर्शित केले तर वैभव स्पोर्ट्स क्लब तर्फे लहत देताना निहाल पंडितने १.१० मि. संरक्षण व ४ गुण टिपून एकतफी लढत द्यायचा प्रयत्न केला.

महिला गटाच्या दुसऱ्या लढतीत सरस्वती कन्या संघाने श्री समर्थ राम मंदिर दादरवर ७-६ असे एक डाव एक गुणाने एकतफी लढत जिंकली. मध्यंतराला ७-३ अशी तब्बल चार गुणांची आघाडी सरस्वती कन्या संघाकडे होती सरस्वती कन्या संघाकडून जानबी लोंढेने ४, ६.३० मि. अशी एकतफी संरक्षणाची खेळी करत श्री समर्थ च्या आक्रमणाच कंबरड मोडल, तिला सेजल यादवने दोन्ही डावात प्रत्येकी २.१० मि. अशी सुंदर साथ दिली.

## तेजलची भारतीय संघात स्थान

**जालना:** तेजल साळवे हिची सौदी अरेबियातील जेद्दा येथे होणाऱ्या आशिया कप तिरंदाजी स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. तेजलने आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना तिरंदाजीमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक पटकाविले होते. या स्पर्धेत देशातील अनेक विद्यापीठातून खेळाडू सहभागी झाले होते. देशातील अनेक नामांकित विद्यापीठातील खेळाडूंवर मात करीत तेजल साळवे हिने वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले. आजपर्यंत विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून चार पदके मिळवित राष्ट्रीय स्तरावर १७ पदके मिळवून या खेळात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

# भवानी नडगांव क्रिकेट संघाची चमकदार कामगिरी

**। मुंबई । सुजित धाडवे ।**

ग्रामीण भागातील क्रिकेट प्रेमी आणि खेळाडू मोठ्या प्रमाणात मुंबई सारख्या शहरात राहत असून दसऱ्या नंतर बहुतांश क्रिकेट संघ मुंबईत क्रिकेट स्पर्धा आयोजित करतात. महाड तालुक्यातील श्री.मानाई देवी ग्रामस्थ मंडळ, मुंबई मंडळ आणि गावदेवी क्रिकेट संघ सव यांच्यावतीने खारघर येथे एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये ३२ नामांकित क्रिकेट संघामध्ये भवानी नडगांव क्रिकेट संघ अ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तर अष्टपैलू खेळाडू विवेक किजबिले याने मालिकावीर पुरस्कार पटकावला.

दरम्यान महाड तालुका क्रिकेट असोसिएशन मर्यादित अंतर्गत असणाऱ्या या हंगामी वर्षाची प्रथमच नियोजित स्पर्धा असल्याने ३२ संघानी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत कुडूक चॅलेंजर संघ उपविजेतेपद, आशीर्वाद क्रिकेट संघ तुडील तृतीय तर श्री भैरी जोगेश्वरी वामने ब चतुर्थ क्रमांकांचे मानकरी ठरले. उत्कृष्ट फलंदाज अक्षय अगबुल, उत्कृष्ट गोलंदाज सुमित आंबेकर, उत्कृष्ट सिक्सर किंग म्हणून जय बैकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण मनिष पवार तर मालिकावीर विवेक किजबिले हा खेळाडू ठरला. विजेत्या संघाला आणि खेळाडूंना सन्मानचिन्ह व पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

### अष्टपैलू खेळाडू विवेक किजबिले ठरला मालिकावीर

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)